दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१३८ | शुक्रवार दि.०७ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# राज्यात पशुधन विमा योजना लागू!

## शेतकऱ्यांना मिळणार ८५ टक्के प्रीमियम अनुदान; अपघात, नैसर्गिक आपत्ती व रोगामुळे पशुधन मृत्यू झाल्यास आर्थिक संरक्षण

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे या पशुधनाच्या पालक बनल्या असून राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राज्यात पशुधन विमा योजना राबविण्यास सरकारने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. या योजनेमुळे पशुपालक शेतकऱ्यांना अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा रोगामुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास आर्थिक संरक्षण मिळणार आहे.**

पंकजाताई मुंडे यांचा पुढाकार



यासंदर्भात अधिक माहिती देताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, हवामानातील अनपेक्षित बदल, नैसर्गिक आपत्ती, विषबाधा, सर्पदंश, दूषित पाणी, अपघात तसेच लम्पी स्कीनसारख्या साथीच्या रोगांमुळे पशुधनाचे मोठे नुकसान होते. त्यामुळे पशुपालकांचे आर्थिक स्थैर्य टिकविणे, त्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळणे आणि कर्जबाजारी होण्यापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. अपघात, पूर, वीज पडणे, दुष्काळ, वादळ, वनवा, उष्णतेची लाट, भूकंप अशा नैसर्गिक आपत्ती, नैसर्गिक मृत्यू किंवा रोगामुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास विमा संरक्षण लागू राहील. मात्र पशुधनाचे पूर्ण किंवा अंशतः अपंगत्व तसेच वाहतूक जोखीम या योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत. शेळी व मेंढ्यांचे विमा संरक्षण महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक हद्दीतच लागू राहील. या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत करण्यात येणार आहे. देशी व संकरित दुधाळ गायी, म्हशी, बैल, रेडे तसेच शेळ्या ▶▶ पान २ वर

### असे असेल विमा संरक्षण

योजनेत दुधाळ गायीसाठी कमाल ७० हजार रुपये, म्हशीसाठी ८० हजार रुपये, बैलासाठी ७० हजार रुपये, रेड्यासाठी ८० हजार रुपये आणि शेळी अथवा मेंढीसाठी ७ हजार रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्यात येणार आहे. लाभार्थी आपल्या इच्छेनुसार एक, दोन किंवा तीन वर्षांसाठी विमा संरक्षण घेऊ शकणार आहेत. विमा प्रीमियमचा दर एका वर्षासाठी ४.३० टक्के, दोन वर्षांसाठी ७.५० टक्के आणि तीन वर्षांसाठी १०.५० टक्के निश्चित करण्यात आला आहे. या प्रीमियमपैकी ८५ टक्के हिस्सा केंद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अनुदान स्वरूपात दिला जाणार असून उर्वरित १५ टक्के रक्कम लाभार्थ्यांना भरावी लागणार आहे.

### २४ तासांच्या आत विमा कंपनीला माहिती देणे बंधनकारक

पशुधनाचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला मोबाईल ॲप, संकेतस्थळ, ई-मेल, फोन किंवा पत्राद्वारे माहिती देणे आवश्यक राहील. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा लागेल. नो टॅग, नो क्लेम ही अट लागू राहणार असून नैसर्गिक आपत्तीमधील मृत्यूला त्यातून सूट असेल. योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुधनाची १२ अंकी इअर टॅगद्वारे राष्ट्रीय डिजिटल पशुधन प्रणालीवर नोंद असणे तसेच शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे आरोग्य प्रमाणपत्र आवश्यक राहील. लाभार्थ्यांनी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा बँक पासबुक यापैकी ओळखपत्र, इअर टॅग स्पष्ट दिसणारे पशुधनाचे छायाचित्र, पशुपालकासोबतचे छायाचित्र आणि आरोग्य प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

# शिवसेना कोणाची वादात अपात्रता ठरणार निर्णायक!

## सुप्रीम कोर्टाचे मोठे संकेत; पुढील निर्णयाने बदलू शकते संपूर्ण चित्र, अपात्रतेवरच ठरणार पुढचा निर्णय?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना पक्ष आणि पक्षचिन्ह वादावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आज महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवत, आमदारांच्या अपात्रतेची कारवाई आणि पक्षचिन्हाचा प्रश्न हे दोन वेगळे मुद्दे असल्याचे स्पष्ट केले. अपात्रतेच्या कारवाईचा निकाल लागल्यानंतर आणि नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर पक्षचिन्हाचा मुद्दा दुय्यम ठरू शकतो, असे न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी म्हटले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. यावेळी न्यायमूर्ती बागची यांनी अपात्रतेचा विचार करताना




संबंधित आमदाराने स्वेच्छेने मूळ राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले आहे का, हा प्राथमिक निकष असल्याचे नमूद केले. तसेच विधिमंडळ पक्षाचे सदस्यत्व सोडल्याने मूळ राजकीय पक्षाशी असलेला संबंध आपोआप संपुष्टात येत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. युक्तिवाद करताना कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्षांनी अपात्रतेच्या याचिकांवर वेळेत निर्णय न घेतल्याचा आरोप केला. तसेच निवडणूक आयोगाने संघटनात्मक बाजूकडे दुर्लक्ष करून केवळ विधिमंडळातील संख्याबळाच्या आधारे निर्णय घेतल्याचा दावा केला. यामुळे सरकार, पक्ष आणि पक्षचिन्ह या तिन्ही गोष्टी शिंदे गटाला मिळाल्या, असे ते म्हणाले. सत्तेचे आकर्षण असल्यामुळेच सुरुवातीला ३१ आमदारांचा पाठिंबा ३९ आणि नंतर ५६ पर्यंत वाढला, असे सांगत सिब्बल यांनी अपात्रतेच्या कारवाईतील विलंबामुळेच अशी परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप केला. शिवसेनेत फूट पडली तेव्हा बहुतांश खासदार ठाकरे गटासोबत होते; मात्र एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर अनेकांनी बाजू बदलली, असेही त्यांनी सांगितले. सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले की, शिवसेनेची २०१८ मधील ▶▶ पान २ वर

# कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा सरकारचा कट !

## कुणालाही सोडणार नाही ; मनोज जरांगे पाटील संतप्त




जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्र मिळवलेल्या चार मराठा लोकप्रतिनिधींचे दाखले जात पडताळणी समितीने अवैध ठरवले. यावरुन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला. कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याचा सरकारचा कट आहे. माझ्या अंगावर येऊ नका. मी चिडलो तर कुणालाही सोडणार नाही, असा थेट इशारा त्यांनी सरकारला दिला. मराठ्यांनी आता गाफील राहू नये. वेळ पडली तर पुन्हा आंदोलन करावे लागेल, ▶▶ पान २ वर

### पडताळणीत सरकारचा हस्तक्षेप नाही-बावनकुळे

मनोज जरांगे यांच्या आरोपावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जात पडताळणी समितीने एखादा निर्णय घेतला असेल तर तो काही अंतिम नसते. त्यावर उच्च न्यायालयात जाऊन दाद मागता येते. जात पडताळणीच्या कुठल्याही कार्यक्षेत्रात सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. कोणत्याही मंत्र्याला नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### गद्दारीचा डाग मराठ्यांनी पुसला-शिंदेंवर निशाणा

जरागेंनी एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे बरे म्हणायची वेळ आणू नका. एकनाथ शिंदे यांनी खोड्या करु नयेत. चांगली कामे करावीत. तुमच्यावरील गद्दारीचा डाग मराठ्यांनी पुसला. शिंदेंच्या जागा मराठ्यांनी निवडून आणल्या. पण ते आता डबल गेम करत आहेत, अशा शब्दांत जरागेंनी शिंदेंवर निशाणा साधला.

# निवासी डॉक्टरांना संप त्वरित मागे घेण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

## न्यायालयाच्या निर्देशांचे राज्य सरकार पालन करेल-फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**होमिओपॅथी डॉक्टरांच्या नोंदणीच्या मुद्द्यावरून डॉक्टरांनी पुकारलेल्या संपाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे राज्य सरकार पालन करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सांगितले.**

डॉक्टरांनी आंदोलन करणे योग्य नाही असे नमूद करत, या प्रकरणात सरकारकडे दुसरा कोणताही पर्याय नाही आणि वैद्यकीय शाखेची कोणतीही पद्धत असली तरी सरकार प्रत्येक डॉक्टरला समान महत्त्व देते, असे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्र मेडिकल




कौन्सिल अंतर्गत होमिओपॅथ्सच्या नोंदणीला विरोध करण्यासाठी निवासी डॉक्टरांनी पुकारलेला संप त्वरित मागे घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने गुरुवारी दिले. या आंदोलनामुळे राज्यातील रुग्णालयांमधील रुग्णांवर होणाऱ्या परिणामांबद्दल न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती. त्यानंतर, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्सने संप मागे घेण्याचे आश्वासन न्यायालयाला दिले. होमिओपॅथ्सना मेडिकल कौन्सिल अंतर्गत नोंदणी करण्यास आणि ॲलोपॅथिक औषधे लिहून देण्यास परवानगी देण्याच्या सरकारच्या ▶▶ पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांना आता रिल करण्यास बंदी

## कर्मचारी ड्युटीवर असल्यास सोशल मीडिया वापरावर कडक निर्बंध

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडिया वापराबाबत नवी आचारसंहिता जाहीर केली आहे. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी जारी केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार, कर्मचाऱ्यांनी ऑन-ड्यूटी अथवा गणवेशात असताना रील्स, व्हिडिओ किंवा लाईव्ह स्ट्रीमिंग केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. एसटीची प्रतिमा मलिन होण्यापासून रोखणे आणि



सुरक्षेचे नियम पाळणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

नवीन नियमांनुसार चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांना एसटी बस, आगार, बसस्थानक किंवा कार्यालयीन परिसरात गणवेशात व्हिडिओ अथवा रील्स बनवण्यास ▶▶ पान २ वर

# जालन्यात महाविद्यालयाच्या प्राचार्यासह पाच जण एसीबीच्या जाळ्यात

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या देयकासाठी दीड लाखांच्या लाचेची मागणी

जालना । प्रतिनिधी

सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला निवृत्तीनंतर मिळणारी देयके मंजूर करून देण्यासाठी दीड लाख रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्यांसह पाच जणांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी), जालना यांनी रंगेहाथ ताब्यात घेतले. या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, जालना येथून ३० जून २०२५ रोजी प्रबंधक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. निवृत्तीनंतर मिळणारे ३०० दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणाचे ९ लाख ३३ हजार ४०८ रुपये, कालबद्ध पदोन्नतीचे लाभ तसेच जीपीएफची रक्कम देण्यासाठी महाविद्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांनी दीड लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार त्यांनी ३० जुलै २०२६ रोजी एसीबीकडे केली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एसीबीने महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयात सापळा रचला. आरोपींनी १ लाख ५० हजार रुपयांची ▶▶ पान २ वर

# ॲनालॉग पनीरवर कायमस्वरूपी बंदी घाला!

## दुग्ध क्षेत्राची मोठी मागणी, तुकाराम मुंढेंचे कौतुक

पुणे । प्रतिनिधी

**राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ॲनालॉग किंवा दुग्धविरहित पनीरचे उत्पादन, प्रक्रिया, तयारी, पॅकिंग, साठवण, वितरणावर एक वर्षासाठी बंदी घालण्याच्या आदेशाचे दुग्ध वर्तुळातून स्वागत करण्यात येत आहे. यामुळे दुधापासूनच्या शुद्ध पनीरला चांगले दिवस येण्याची आशा निर्माण झाली असून, पनीर बनविण्यासाठी दूध खरेदीस स्पर्धा निर्माण होईल. त्यातून शेतकऱ्यांनाही वाजवी दर मिळणे अपेक्षित असून, ॲनालॉग पनीरवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी दुग्ध क्षेत्रामधून होत आहे.**




राज्य दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या शिष्टमंडळाने सर्वप्रथम मुंढे यांची मुंबई येथे भेट घेऊन ॲनालॉग पनीरवर बंदी घालण्याची मागणी केली होती. याची दखल घेतल्याने या कल्याणकारी संघाकडून निर्णयाचे स्वागत असल्याची प्रतिक्रिया अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांनी दिली. ते म्हणाले, २०० रुपये किलोने स्वस्त मिळणाऱ्या ॲनालॉग पनीरच्या उपलब्धतेमुळे त्याचा खप राहत असे. यापूर्वी सुट्या स्वरूपात होणाऱ्या पनीरच्या विक्रीत जवळपास ५० टक्क्यांनी घट झाली असून, ग्राहकांचा कल आता ब्रँडेड व पॅकबंद पनीरकडे वळला आहे. परिणामी, पनीरच्या विक्रीत सुमारे ४० टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती दुग्ध व्यवसायातील सूत्रांनी दिली. साहजिकच डेअऱ्यांकडील दुधापासूनच्या शुद्ध पनीरला तुलनेने मागणी कमी राहत असे. या पनीरचा भाव सरासरी ४०० रुपये किलो आहे. आताॲनालॉगवर बंदी घातल्यामुळे शुद्ध पनीरला ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### अर्थखाते राष्ट्रवादीकडे द्या-अमोल मिटकरी

पुणेः उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याचे अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्पुरते स्वत:कडे ठेवले होते. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर हे खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडे दिले जाईल, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. मात्र अधिवेशन संपले तरी अर्थ खाते अद्याप मुख्यमंत्र्यांकडेच असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून या खात्यासाठी जोरदार मागणी केली जात आहे. अमोल मिटकरी यांनी केलेल्या या पोस्टमुळे अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्याच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'एक्स'वरील पोस्टद्वारे दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली आहे. महायुतीतील विश्वास आणि परस्पर सन्मान कायम राखण्यासाठी अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे सोपवावे, अशी त्यांनी मागणी केली आहे.

### केवळ फतव्याच्या आधारे घटस्फोट नाही - हायकोर्ट

भोपाळः "मुस्लिम जोडप्याचा घटस्फोट झाल्याचे घोषित करणाऱ्या आदेशाचा आधार फतवा असू शकत नाही. कोणतीही धार्मिक संस्था मुस्लिम पुरुषाला घटस्फोट मंजूर करू शकत नाही," असे स्पष्ट करत भोपाळच्या दारुल-दफा मशिद कमिटीने जारी केलेल्या फतव्याच्या आधारे घटस्फोटाची घोषणा मागणाऱ्या पतीचा दावा मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. तथापि, न्यायालयाने हे स्पष्ट केले की पतीला कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी नियमित याचिका दाखल करण्याचे स्वातंत्र्य असेल. कौटुंबिक न्यायालयाने ११ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या आदेशाविरोधात पत्नीने उच्च न्यायालयात पुनरीक्षण याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्या पत्नीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, पतीने केवळ एका फतव्याच्या आधारावर घटस्फोटाची मागणी केली आहे. असा फतवा जारी करण्याचा किंवा घटस्फोट देण्याचा मशिद समितीला कोणताही कायदेशीर अधिकार नाही. तसेच, सदर फतव्यात केवळ इस्लामिक ग्रंथांचा हवाला देऊन कोणत्या परिस्थितीत घटस्फोट मागता येऊ शकतो, याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उल्लेख आहे, असे वकिलांनी निदर्शनास आणून दिले.

### त्वचादानासाठी संपूर्ण देशात व्यापक यंत्रणा उभारा-तावडे

नवी दिल्ली : गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी देशात त्वचादान आणि स्किन बँकिंगची व्यवस्था अधिक मजबूत करण्याची अत्यंत गरज आहे, असे म्हणत भाजप खासदार विनोद तावडे यांनी राज्यसभेत या महत्त्वाच्या मुद्द्याकडे सरकारचे लक्ष वेधले. राज्यसभेत बोलताना खा. विनोद तावडे म्हणाले की, गंभीर भाजलेल्या रुग्णांसाठी दान केलेली त्वचा ही एखाद्या संरक्षकासारखे काम करते. यामुळे रुग्णाच्या शरीराला संसर्ग होत नाही आणि शरीरातील पाणी कमी होत नाही. कायमस्वरूपी उपचार होईपर्यंत ही त्वचा रुग्णाचा जीव वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सरकारने नोटोच्या (राष्ट्रीय अवयव आणि उती प्रत्यारोपण संघटना) माध्यमातून अवयवदानासाठी चांगले काम केले आहे. मात्र, त्वचादानाबाबत अजूनही समाजात पुरेशी जनजागृती झालेली नाही. जर आपण स्किन बँक्सची संख्या वाढवली आणि संपूर्ण देशात त्वचा संकलनाची उत्तम व्यवस्था केली, तर हजारो रुग्णांना वेळेवर मदत मिळू शकेल, असे त्यांनी नमूद केले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ५९.५० क्विंटल | २,०५१ | २,९९० | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड : १०७.५० क्विंटल | २,२०१ | ४,४०० | ३,०७८ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | २,१८० | २,१८० | २,१८० |
| तूर : १.०० क्विंटल | ३,८६० | ४,००० | ३,९३० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:५३.०० क्विंटल | २,३७० | २,८०१ | २,६०९ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ४,८०१ | ६,५०० | ५,७६२ |

## अग्रलेख


# लोकशाहीचा नवा अध्याय? प्रत्येक निर्णय कोर्टातच का!

भारतीय लोकशाहीत एक लक्षणीय बदल गेल्या काही वर्षांत स्पष्टपणे जाणवू लागला आहे. एकेकाळी राजकीय संघर्ष संसदेत, विधानसभेत, जनआंदोलनांत किंवा थेट जनतेसमोर लढले जात होते. आज मात्र जवळपास प्रत्येक महत्त्वाचा राजकीय, प्रशासकीय किंवा धोरणात्मक वाद उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचताना दिसतो. सरकारचा निर्णय असो, निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, आरक्षण, नियुक्त्या, आंदोलनांवरील कारवाई, पर्यावरण, धार्मिक प्रश्न किंवा सोशल मीडियावरील निर्बंधअखेरीस निर्णयाची अपेक्षा न्यायालयाकडूनच केली जाते. हा लोकशाहीच्या बळकटीकरणाचा संकेत आहे की इतर संस्थांवरील घटत्या विश्वासाचा, हा गंभीर प्रश्न आहे.

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना अनुच्छेद ३२ आणि अनुच्छेद २२६ अंतर्गत न्यायालयात जाण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद ३२ ला राज्यघटनेचे ''हृदय आणि आत्मा'' म्हटले होते. त्यामुळे नागरिकांनी न्यायालयाचे दार ठोठावणे हे लोकशाहीच्या चौकटीत पूर्णपणे वैध आहे. जेव्हा कार्यपालिका किंवा प्रशासनाकडून न्याय मिळत नाही, तेव्हा न्यायालय नागरिकांचा शेवटचा घटनात्मक आधार ठरते. त्यामुळे याचिकांची संख्या वाढणे हे काही प्रमाणात न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचेही प्रतीक मानता येते. मात्र या चित्राची दुसरी बाजू अधिक चिंताजनक आहे. आज अनेक राजकीय प्रश्न न्यायालयात पोहोचण्यामागे केवळ घटनात्मक हक्कांचे संरक्षण हा उद्देश नसतो; अनेकदा राजकीय रणनीतीचाही भाग असतो. निवडणुकीतील पराभवानंतरचे वाद, सरकारच्या नियुक्त्या, चौकशी यंत्रणांची कारवाई, विधिमंडळातील निर्णय, आंदोलनांवरील कारवाईअनेक विषय प्रथम राजकीय पातळीवर न सुटता थेट न्यायालयात नेले जातात. यामुळे लोकशाहीतील राजकीय संवाद आणि संस्थात्मक तोडग्यांची क्षमता कमी होत असल्याची भावना निर्माण होते. २०२६ मधील घडामोडींकडे पाहिल्यास ही प्रवृत्ती अधिक ठळक दिसते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनांशी संबंधित प्रकरणे, निवडणूक प्रक्रियेवरील आक्षेप, तरुण वकिलांच्या स्टायपेंडचा प्रश्न, नियुक्त्या, आरक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार, पर्यावरणीय निर्णय अशा विविध विषयांवर न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागला. यातील अनेक प्रश्नांचे मूळ राजकीय किंवा प्रशासकीय असले, तरी अंतिम उत्तर न्यायालयाकडूनच अपेक्षित होते. याचा सर्वात मोठा परिणाम न्यायव्यवस्थेवर होतो. देशातील न्यायालयांमध्ये आधीच कोट्यवधी खटले प्रलंबित आहेत. सामान्य नागरिकांची दिवाणी, फौजदारी, कौटुंबिक किंवा मालमत्तेची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. अशा परिस्थितीत प्रत्येक राजकीय संघर्ष न्यायालयात नेला गेला, तर न्यायालयांचा वेळ आणि संसाधने अधिकच ताणली जाणार, हे वास्तव आहे. परिणामी न्याय मिळण्यास होणारा विलंब ही समस्या आणखी गंभीर होऊ शकते. मात्र या चर्चेत न्यायालयांवर टीका करण्याइतकेच इतर घटनात्मक संस्थांकडेही पाहण्याची गरज आहे. संसदेत प्रभावी चर्चा होत नसल्याची टीका वारंवार होते. संसदीय समित्यांची भूमिका मर्यादित होत असल्याची भावना व्यक्त केली जाते. स्वायत्त संस्थांच्या निर्णयांवर सातत्याने प्रश्न उपस्थित होतात. अशा परिस्थितीत नागरिक किंवा विरोधी पक्ष न्यायालयाकडे वळतात, हेही तितकेच वास्तव आहे. म्हणजेच वाढत्या याचिका हे केवळ न्यायालयांचे नव्हे, तर लोकशाहीतील संस्थात्मक संतुलनाचेही प्रतिबिंब आहे. याच ठिकाणी सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा विचार महत्त्वाचा ठरतो. विधिमंडळाने कायदे करणे, कार्यपालिकेने त्यांची अंमलबजावणी करणे आणि न्यायपालिकेने त्यांची घटनात्मक तपासणी करणे, ही भारतीय लोकशाहीची मूलभूत रचना आहे. जर प्रत्येक धोरणात्मक किंवा राजकीय प्रश्नाचा अंतिम निर्णय न्यायालयाकडूनच अपेक्षित असेल, तर या संतुलनावर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, जर कार्यपालिका आणि विधिमंडळ आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत नसतील, तर न्यायपालिकेने पूर्णपणे अलिप्त राहावे, अशी अपेक्षाही वास्तववादी ठरणार नाही. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर कोणत्याही एका टोकाला नाही. भारतीय लोकशाहीची ताकद ही संस्थांमधील समतोल, परस्पर उत्तरदायित्व आणि नागरिकांचा विश्वास यात आहे.

न्यायालये ही लोकशाहीची संरक्षक आहेत; परंतु ती लोकशाहीची एकमेव आधारस्तंभ नाहीत. संसद, विधानमंडळे, निवडणूक आयोग, स्वायत्त संस्था, माध्यमे आणि नागरिक समाज यांचीदेखील तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. या संस्था सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह असतील, तर प्रत्येक प्रश्न न्यायालयात नेण्याची गरज कमी होईल. आजचा मूलभूत प्रश्न न्यायालयांनी किती हस्तक्षेप करावा हा नाही; तर इतर लोकशाही संस्था इतक्या सक्षम आहेत का की नागरिकांचा विश्वास त्यांच्यावर टिकून राहील? कारण लोकशाहीचे अंतिम केंद्र न्यायालय नसते, संसदही एकटी नसते. लोकशाहीचे खरे केंद्र नागरिकांचा विश्वास असतो. तो विश्वास सर्व घटनात्मक संस्थांनी आपल्या कार्यातून कमावला, तर न्यायालयांकडे धाव घेण्याची गरज नैसर्गिकरीत्या कमी होईल. आणि कदाचित तेव्हाच भारतीय लोकशाही अधिक परिपक्व आणि संतुलित असल्याचे म्हणता येईल.

## जेनझीवर डोळे मिटून विश्वास ठेवणार-मोहन भागवत



**मुंबई । प्रतिनिधी**

**जेन झींचं आंदोलन का झालं, का नाही ? याची पूर्ण उत्तरं ना माझ्याकडे आहेत, ना तुमच्याकडे आहेत. मीदेखील काही वाचूनच मतं बनवतो आहे. खरं काय, खोटं काय, मला माहिती नाही असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. मला डोळे मिटून विश्वास ठेवायचं म्हंटलं, तर मी जेनझीवर डोळे मिटून विश्वास ठेवेन असेही मोहन भागवत म्हणाले. मुंबईत मोहन भागवत यांनी गुरूवारी जेन झीशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. आयआयएमयुएनचे संस्थापक ऋषभ शाह यांनी त्यांची मुलाखत घेतली.**

आंदोलन डायलॉगचा प्रकार आहे. ऐकलं जात नसेल तर आंदोलन होत असतात. आत्ता जे झालं ते ग्रेव्हिएन्सेस आहे. शिक्षण व्यवस्थेत अनेक गोष्टी व्यवस्थित नाहीत, बदल करायला हवा असे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. आमच्या पिढीत मोठ्यांचे ऐकत होतो. आताचे जेनझी आणि अल्फा प्रश्न विचारतात आणि त्यांना प्रेम पाहिजे. वेगवेगळे ओपिनियन यातून येत असतात आंदोलन वगैरे जेनझी यांनी करायचे नाही असं मी म्हणणार नाही. मात्र ते कसं करायचं हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात सांगितलं आहे. आंदोलन सिस्टिम करेक्शनसाठी होणं गरजेचं असेही ते म्हणाले. जे कधी व्हायला पाहिजे ते होत नाही तेव्हाच आंदोलनं होतात. जेनझी आपलीच पिढी आहे, आपलेपणा हवा. जेनझी जेन अल्फा आमच्यापेक्षा जास्त प्रामाणिक आहेत असेही ते म्हणाले. शिक्षण कमर्शिअल बिझनेस नाही, जगण्याची गरज आहे. सगळ्याच दृष्टीने याचा आता विचार व्हायला हवा असे भागवत म्हणाले. मी आपल्या जागी काय करु शकतो याचा विचार व्हायला हवा. शिक्षणाचा भार आपल्या सर्वांनी देखील उभारला पाहिजे. पुढची पिढी आपण बनवण्यासाठी शिक्षण देत असतो, फक्त पैसे कमावण्यासाठी नाही. शिक्षणासाठी ६ टक्के आर्थिक तरतूद असावी ही मागणी रास्त असल्याचे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. अंमलबजावणी व्हावी ही आग्रही मागणी नेहमीच असते. सरकारने सगळी व्यवस्था चालवली पाहिजे असं तर नाही आहे, मग आपण पण त्याचा भार उचलू शकतो असेही भागवत म्हणाले. एलजीबीटी समाजाचाच भाग आहे. समलिंगी विवाहाबाबत कायदा करण्याची गरज असल्याचे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. तुम्ही यंत्रणा मिक्स करून नाही चालणार ती सुधारावी लागेल असेही ते म्हणाले.

## तेहलकाचे संपादक तरूण तेजपाल यांना दहा लाखाच्या दंडासह १० वर्षांची शिक्षा

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी 'तेहलका'चे माजी संपादक तरुण तेजपाल यांना २०१३ मधील बलात्कार प्रकरणात १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायमूर्ती नीला गोखले आणि न्यायमूर्ती अमित जामसांडेकर यांच्या खंडपीठाने तरूण तेजपाल यांच्यावर १० लाख रुपयांहून अधिकचा दंडही ठोठावला.**

यावेळी राज्याकडून युक्तीवाद करताना सांगितले गेले की, पिडीतेने नकार देऊनही गुन्हा पुन्हा केला गेला आणि त्याबद्दल कोणताही पश्चात्ताप व्यक्त केला गेला नाही, या गोष्टीचा न्यायालयाने विचार केला पाहिजे, असेही यावेळी सांगितले. १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यापूर्वी न्यायालयाने शिक्षेतील सवलतीसाठीच्या मुद्द्यांचाही विचार केला. उच्च न्यायालयाने सांगितले की, ही घटना १३ वर्षांपूर्वी घडली होती. त्यानंतर गैरवर्तणुकीचा कोणताही अहवाल किंवा आरोप नाही. दोन्ही पक्ष आता आयुष्यात पुढे गेले असतील, असेही सांगितले. त्यांना तुरुंग प्रशासनासमोर शरणागती पत्करण्यासाठी दोन आठवड्यांचा कालावधी देण्यात आला. गोवा राज्याने २०२२ मध्ये दाखल केलेल्या अपिलावर न्यायालयाने ही शिक्षा सुनावली. यापूर्वी उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा (ट्रायल कोर्ट) त्यांना निर्दोष मुक्त करण्याचा निर्णय रद्द केला आणि भारतीय दंड संहिते अंतर्गत बलात्कार व लैंगिक छळाच्या गुन्ह्यांसाठी त्यांना दोषी ठरवले होते. त्यानंतर, गुरुवारी दुपारी २.३० वाजता निकाल जाहीर करण्यापूर्वी उच्च न्यायालयाने शिक्षेबाबत त्यांची बाजू ऐकून घेतली. उच्च न्यायालयाने सांगितले की, या सर्व शिक्षा एकाच वेळी भोगल्या जातील, म्हणजेच तरूण तेजपाल यांना एकूण १० वर्षे तुरुंगात राहावे लागेल.

## अंगणवाडी निवड प्रक्रियेत भ्रष्टाचार
## भरती प्रक्रिया स्थगित करून चौकशी करा-गोले



**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथील अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाने केला असून, संपूर्ण भरती प्रक्रिया तात्काळ स्थगित करून उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी याबाबत उपविभागीय अधिकारी तथा अंगणवाडी भरती समितीचे अध्यक्ष, माजलगाव यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, कु. पूजा अनंता ढगे (रा. सुलतानपूर, ता. माजलगाव) यांनी अंगणवाडी मदतनीस पदासाठी नियमानुसार अर्ज दाखल केला होता. संबंधित कार्यालयाने अर्जासह आवश्यक कागदपत्रे स्वीकारल्याची नोंदही केली आहे. मात्र, प्रसिद्ध करण्यात आलेल्या मेरिट लिस्टमध्ये अर्जदाराचे नावच समाविष्ट करण्यात आले नसल्याने भरती प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पात्र उमेदवाराचे नाव कोणतेही कारण न देता मेरिट यादीतून वगळणे हा प्रकार जाणीवपूर्वक करण्यात आला असून, यामध्ये भ्रष्टाचार, पक्षपातीपणा किंवा संगनमत झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याप्रकरणी संपूर्ण भरती प्रक्रिया तात्काळ स्थगित करून स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अर्जदाराचे नाव मेरिट लिस्टमध्ये न घेण्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर शिस्तभंगाची तसेच कायदेशीर कारवाई करावी आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत नियुक्ती प्रक्रिया थांबवावी अशी मागणी भाई ड. नारायण गोले पाटील यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी, पंचायत समिती माजलगाव तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी (उउझज), माजलगाव यांनाही माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी न झाल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी दिला आहे.

# मराठवाड्यातील पहिले पिरॅमिड ध्यान केंद्र जालन्यात

**जालना । प्रतिनिधी**

**मानसिक शांतता, सकारात्मक ऊर्जा आणि आत्मिक विकासासाठी ध्यानधारणेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील पहिले पिरॅमिड अध्यात्मिक ध्यान केंद्र यांच्या वतीने जालना येथे रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष पिरॅमिड ध्यान शिबिराचे आयोजन शौर्य रिसॉर्टस व लॉन्स राजूर रोड जालना येथे सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे.**

पिरॅमिड ध्यान पद्धतीमध्ये पिरॅमिडच्या विशिष्ट आकाराचा ध्यानासाठी उपयोग केला जातो. पिरॅमिडच्या आत शांतपणे बसून श्वासावर लक्ष केंद्रित करणे, मन स्थिर ठेवणे आणि ध्यानाच्या माध्यमातून अंतर्मुख होण्याचा सराव या शिबिरात करून घेण्यात येणार आहे. ध्यानामुळे तणाव कमी करण्यास, एकाग्रता वाढविण्यास आणि मनःशांतीचा अनुभव घेण्यास मदत होऊ शकते. या शिबिरामध्ये पिरॅमिड ध्यान म्हणजे काय, त्यामागील संकल्पना, ध्यान करण्याची योग्य पद्धत, ध्यानातील एकाग्रता तसेच दैनंदिन जीवनात ध्यानाचा उपयोग याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नवशिक्यांपासून ध्यानाची आवड असलेल्या नागरिकांपर्यंत सर्वांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे. ''शांत मन, सकारात्मक विचार आणि निरोगी जीवनासाठी ध्यानाची वाटचाल'' हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचा जालना शहरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आध्यात्मिक ध्यानकेंद्र जालना ,शिल्पा अंभुरे यांनी केले आहे. या विशेष सत्रामध्ये ते पिरॅमिड ऊर्जेचे सखोल ज्ञान आणि त्याचे जीवनातील महत्त्व याविषयी विस्तृत मार्गदर्शन करणार आहेत. आपण सर्वजण या ऐतिहासिक कार्यक्रमात सहभागी होऊन महाराष्ट्राची सामूहिक ध्यान ऊर्जा वाढवू आणि आपल्या आत्मिक प्रगतीसाठी या अमूल्य संधीचा लाभ घेऊ या. जालना टीम अतिशय भव्य आणि सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. अय्यापा पिंडी सर प्रथमच महाराष्ट्रात येत आहेत. त्यांच्या प्रेरणेने अध्यात्मित पिरॅमिड ध्यान केंद्र जालना , शिल्पाताई अंभुरे आणि त्यांची पूर्ण टीम महाराष्ट्रात पिरॅमिड ऊर्जेचा प्रसार करत आहेत. यासोबतच अखंड ध्यान आणि मास्टर ज्ञानेश्वरजी यांच्यासोबत ध्यान करण्याचीही दुर्मिळ संधी उपलब्ध होणार आहे.

# कॉंग्रेसची आढावा बैठक व 'रघुपती राघव राजाराम' आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार जालना जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने मा. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात जालना तालुका कॉंग्रेस कमिटीची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.**



बैठकीस जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, माजी आमदार राजेश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्यासह जालना तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राज्यातील व जिल्ह्यातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीच्या यादीतील त्रुटी, लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थी, नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण, शेतकऱ्यांना पीककर्ज वितरणातील अडचणी तसेच जालना जिल्ह्यातील विविध प्रलंबित लोकहिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्यासाठी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ''रघुपती राघव राजाराम'' आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. पदाधिकारी व कार्यकर्त्यांना जनतेच्या प्रश्नांबाबत अधिक सक्रिय राहण्याचे आवाहन केले. तसेच आगामी आंदोलन यशस्वी करण्यासाठी गावपातळीपर्यंत संघटन बळकट करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करण्याचे निर्देश दिले. बैठकीस कल्याण दळे, राजेश राठोड, बदरभाई चाऊस, कृष्णा पडूळ, ज्ञानेश्वर डुकरे, अशोकराव उबाळे, नारायण वाडेकर, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर इंगोले, सुरेश कदम, नारायण काका शिंदे,गणेश खरात,फकिराव मोहिते ,सर्जेराव पटेकर ,लाला पाटिल लकडे,विक्रम चव्हाण ,सुधाकर ढोकळे, बाळू वाहुळे, काकासाहेब गवारे देविदास चव्हाण तसेच जालना तालुक्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरून...

### राज्यात पशुधन

आणि मेंढ्यांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक कुटुंबाला कमाल १० पशुधन घटकापर्यंत या योजनेचा लाभ मिळणार असून त्यापेक्षा अधिक पशुधनाचा विमा काढायचा असल्यास अतिरिक्त पशुधनाचा संपूर्ण प्रीमियम लाभार्थ्यालाच भरावा लागणार आहे. पशुधनाची विमा रक्कम चालू बाजारभावानुसार निश्चित केली जाणार असून त्यासाठी पशुपालक, विमा कंपनी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त मूल्यांकन होईल. दुधाळ जनावरांच्या बाबतीत दूध उत्पादनाच्या आधारे किंमत निश्चित करण्यात येणार आहे. सर्व आवश्यक कागदपत्रे पूर्ण झाल्यानंतर विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत दावा थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा करणे बंधनकारक राहील. १५ दिवसांनंतर विलंब झाल्यास लाभार्थ्याला वार्षिक १२ टक्के व्याजदराने अतिरिक्त भरपाई द्यावी लागणार आहे. दावा नाकारल्यास त्याचा पुनर्विचार करण्यासाठी प्रादेशिक आणि राज्यस्तरीय समित्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. दाव्यांच्या नोंदणीसाठी आणि जलद निकाली काढण्यासाठी विमा कंपनीकडून मराठी व इंग्रजी भाषेतील ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात येणार असून जिल्हास्तरावर मदत कक्ष, ग्राहक सेवा क्रमांक आणि तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करून दिली जाणार आहे. योजनेचा प्रचार दूध संकलन संस्था, गो-मित्र आणि पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून केला जाणार आहे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर पशुधनाची ओळख, आरोग्य तपासणी, बाजारमूल्य निश्चिती, टॅगिंग, आरोग्य प्रमाणपत्र आणि मृत्यूनंतर शवविच्छेदन अहवाल ७२ तासांत सादर करण्याची जबाबदारी राहणार आहे, अशी माहिती मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली.

-------------

### कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा

असे आवाहनही त्यांनी मराठा समाजाला केले. ते अंतरवाली सराटीत पत्रकार परिषदेत बोलत होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कुणबी प्रमाणपत्र रद्द करायला सांगितले. एकट्या बावनकुळे यांच्यासाठी तुमचे २५ -३० आमदार सहज पाडीन, असा इशाराही त्यांनी दिला. मला एकटे पाडण्यासाठी कट रचला गेला. सरकार मराठा तरुणांचे वाटोळे करत आहे. आमच्या नोंदी सापडूनही प्रमाणपत्रे रद्द केली. मराठा मुलांनी आरक्षणासाठी आणखी किती पुरावे द्यायचे? तुकडे बिलापासूनच्या पावत्या कुणबी नोंदीसाठी दिल्या आहेत. पण केवळ तुमच्या राजकीय स्वार्थासाठी प्रमाणपत्रे रद्द केली, असा गंभीर आरोप करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर हल्लाबोल केला. बावनकुळे जे करत आहेत त्यावर फडणवीस का बोलत नाहीत? याचाच अर्थ तुमची त्यांना मुकसंमती आहे. असा सवाल त्यांनी केला. केवळ १५ लाखांसाठी प्रमाणपत्र रद्द करता का? दबावापोटी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारने कुणबी प्रमाणपत्रांबाबत जो निर्णय घेतला आहे, त्यावर फेरविचार करावा. अन्यथा मराठा समाज पुन्हा आंदोलन करेल, असा इशारा जरागेंनी सरकारला दिला.

----------

### शिवसेना कोणाची वादात अपात्रता

पक्षघटनाच ग्राह्य धरली पाहिजे. त्या घटनेनुसार पक्षातील प्रमुख नेते, उपनेते, सचिव, संपर्कप्रमुख आणि जिल्हाप्रमुख यांचा पाठिंबा उद्धव ठाकरे यांनाच होता. निवडणूक आयोगाने ही बाब विचारात घेतली नाही, असा आरोपही त्यांनी केला. यावर न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी हा मुद्दा न्यायालयासमोर सिद्ध करावा लागेल, असे स्पष्ट केले. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी सुभाष देसाई प्रकरणाचा उल्लेख करताना, त्या निकालात न्यायालयाने अपात्रतेच्या मुद्द्यावर निर्णय दिलेला नव्हता, तर केवळ प्रतोद आणि विधिमंडळ पक्षनेत्याच्या नियुक्तीच्या वैधतेचा विचार केला होता, असे स्पष्ट केले. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील संबंध अधोरेखित करत त्यांनी अपात्रतेचा मुद्दा स्वतंत्र असल्याचे नमूद केले. लोकशाही व्यवस्थेचा पाया संस्थात्मक सचोटीवर अवलंबून असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती बागची यांनी निवडणूक आयोगानेही आपल्या आदेशात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा उल्लेख केला असल्याचे सांगितले. पक्षबदल हा घटनात्मक गुन्हा असल्याची संकल्पना मांडली गेली होती; मात्र आज तो प्रतिष्ठेचे लक्षण बनल्याचे दिसत असल्याची टिप्पणीही त्यांनी केली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान राजकीय पक्षांतर्गत लोकशाहीचा मुद्दा उपस्थित केला. पक्षाची सुरुवातीची रचना लोकशाही तत्त्वांवर आधारित होती; मात्र नंतरच्या बदलांमुळे अधिकार एका व्यक्तीकडे केंद्रीत झाले. लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणाऱ्या संस्थांबरोबरच राजकीय पक्षांनीही लोकशाही पद्धतीने कार्य करणे अपेक्षित नाही का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर कपिल सिब्बल यांनी पक्षाच्या अंतर्गत रचनेचा प्रश्न हा निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रात येत नसल्याचा युक्तिवाद केला. या प्रकरणाची सुनावणी पुढेही सर्वोच्च न्यायालयात सुरू राहणार असून, अपात्रता आणि पक्षचिन्ह या दोन्ही मुद्यांवरील न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

----------

### एसटी कर्मचाऱ्यांना आता

पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. वाहन चालवताना शॉर्ट्स, रील्स किंवा लाईव्ह स्ट्रीमिंग करण्यावर सक्त बंदी घालण्यात आली असून महामंडळाशी संबंधित गोपनीय माहिती, संवेदनशील फोटो किंवा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यास अटकाव करण्यात आला आहे. सकारात्मक आशयाचे व्हिडिओ पोस्ट करायचे असल्यास संबंधित सक्षम अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील. नियम मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून शिस्तभंगाची कारव३ाई केली जाईल. दुसरीकडे, सोशल मीडियावर सक्रिय असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कौशल्याचा वापर महामंडळाच्या हितोद्देशासाठी करून घेण्याची योजना आखण्यात आली आहे. प्रवासी सुविधा, स्वच्छता मोहीम, लोककल्याणकारी उपक्रम आणि रस्ते सुरक्षेचा प्रसार करण्यासाठी एसटीतील इन्फ्लुएन्सर कर्मचाऱ्यांना नियमांच्या अधीन राहून प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी विभाग स्तरावर संवाद बैठका घेऊन कर्मचाऱ्यांना अधिकृत माहिती पुरवली जाईल. तसेच, मध्यवर्ती कार्यालयाच्या जनसंपर्क शाखेकडे अशा सक्रिय कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

----------

### निवासी डॉक्टरांना संप त्वरित मागे

निर्णयाविरुद्ध मार्डने बुधवारपासून बेमुदत संप पुकारला होता. पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. उच्च न्यायालयाने डॉक्टरांना स्पष्टपणे सांगितले आहे की, त्यांना वेतन मिळत आहे आणि त्यामुळे त्यांनी रुग्णांची सेवा केलीच पाहिजे. काही अनुचित घडल्यास त्याला डॉक्टरच जबाबदार धरले जातील. उच्च न्यायालयाचे आदेश आम्हाला बंधनकारक आहेत. त्यानुसारच आम्ही नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. या प्रकरणावर उच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी सुरू आहे. कोणाचीही बाजू घेण्याऐवजी, उच्च न्यायालय जे काही निर्देश देईल त्यानुसार आम्ही कार्यवाही करू, असे ते म्हणाले. ॲलोपॅथिक वैद्यकीय पद्धतीचा सराव करणारे आमचे एमबीबीएस डॉक्टर उत्कृष्ट काम करत आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. मला वाटते की आंदोलन करणेही योग्य नाही. जर उच्च न्यायालयाने आम्हाला स्वतंत्र नोंदणी ठेवण्याचे निर्देश दिले, तर आम्ही तसे करू. न्यायालय जे काही निर्देश देईल, त्यानुसार आम्ही कार्यवाही करू, असे फडणवीस म्हणाले.

----------

### ॲनालॉग पनीरवर कायमस्वरूपी

मागणी वाढेल आणि शेतकऱ्यांनाही चार पैसे जादा दर शक्य होईल. आगामी श्रावण महिना तसेच गौरी-गणपती सणांच्या पार्श्वभूमीवर दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या मागणीत आणखी वाढ होण्याची अपेक्षा आहे. डेअरी उद्योगासाठी फायदेशीर निर्णय घेतल्याबद्दल मुंढे यांचे अभिनंदनही करीत असल्याचे सांगण्यात आले.

----------

### जालन्यात महाविद्यालयाच्या प्राचार्यासह

लाच स्वीकारताच पथकाने कारवाई करून त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणात प्राचार्य राहुल नारायण हिवराळे (५३), कार्यालय अधीक्षक बबन रामदास राठोड (५१), पहारेकरी ईश्वरदास अंबादास शिंदे (४८), लिपिक कैलास गबाजी कुरंगळे (५२) आणि ग्रंथालय सहायक ज्ञानेश्वर मुरलीधर मदन (५१) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. या सर्वांविरुद्ध तालुका जालना पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ मधील कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात येणार असल्याचे एसीबीने सांगितले. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी शरदचंद्र रोडगे तसेच एसीबीतील पोहेकॉं अतिश तिडके, गजानन खरात, पोअं. गजानन कांबळे, गणेश चेके, शिवलिंग खुळे, अमोल चेके, मनोहर भुतेकर, संदीप लहाने चालक भालचंद्र बिनोरकर या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. ०७ ऑगस्ट २०२६


## थोडक्यात



### महिलांच्या सहभागातून हरित क्रांती; उज्वल महिला शेतकरी गटाचा प्रेरणादायी उपक्रम

दिंद्रूड । प्रतिनिधी

दिंद्रूड येथे ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने २५ हजार वृक्षारोपण करण्यात येत आहे. येथील उज्वल महिला शेतकरी गटाच्या महिला सदस्यांनी सरस्वती नदीकाठावर सुरू असलेल्या वृक्षारोपण मोहिमेत मंगळवारी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत झाडे लावा, झाडे जगवा हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.यावेळी उज्वल महिला शेतकरी बचत गटाच्या अध्यक्षा सरीता कडप्पा गिराम, सचिव मनिषा लक्ष्मण काटकर यांच्या सह सुनीता बंडू खांडेकर,कांता शाम कटारे, चंद्रकला भागवत कटारे, जयश्री पांडुरंग कटारे, भाग्यश्री कृष्णा कटारे, भाग्यश्री हनुमंत केकान,मिरा गोपाळ खांडेकर,लता नागोराव खांडेकर, सुनिता बालासाहेब कटारे या महिला सदस्यांनी एकत्रितपणे ८०० वृक्षांची लागवड केली. पर्यावरण संरक्षण, जलसंवर्धन आणि हरित दिंद्रूडच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी महिलांनी केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या सामाजिक उपक्रमाबद्दल ग्लोबल विकास ट्रस्ट व वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन समिती यांच्या वतीने उज्वल महिला शेतकरी गटातील सर्व महिला सदस्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### संगमेश्वर मंदिर परिसरात ५० फळझाडांचे वृक्षारोपण

दिंद्रुड । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत संगम येथील संगमेश्वर मंदिर परिसरात श्री. अनिल डापकर यांच्या पुढाकाराने बुधवारी सकाळी



वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात आंबा, जांभूळ, सीताफळ, आवळा, चिंच आदी विविध प्रकारच्या फळझाडांची एकूण ५० रोपे लावण्यात आली.विशेष म्हणजे, वृक्षारोपणानंतर या सर्व रोपांचे संगोपन करून ती जगविण्याची जबाबदारीही श्री. डापकर यांनी स्वीकारली. त्यामुळे त्यांच्या पर्यावरणप्रेमी उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून स्वागत करत कौतुक केले.कार्यक्रमास संगम (ता. धारूर) येथील प्रतिष्ठित नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.संगमेश्वर मंदिर परिसर हिरवागार करण्याच्या या उपक्रमामुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडणार असून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने हा उपक्रम प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाबद्दल श्री. अनिल डापकर यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

## ऍलोपथी डॉक्टरांच्या राज्यव्यापी संपामुळे महाराष्ट्र राज्याची आरोग्य व्यवस्था कोलमडली ; आजपासून आपत्कालीन सेवाही बंद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**बीएचएमएस–सीएमपी पात्र डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणीच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशनने आणि मार्ड संघटनेने पुकारलेल्या बेमुदत संपामुळे महाराष्ट्र राज्याची सरकारी व खाजगी आरोग्य व्यवस्था करून पडली असल्याचे दृश्य महाराष्ट्रात सर्वत्र पहावयास मिळत आहे. सरकारने यां ब्रिज कोर्स द्वारे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य असुरक्षित केल्याचा आरोप संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केला. सरकारने हा तुघलकी निर्णय तात्काळ रद्द करून बीएचएमएस, सीसीएमपी कोर्स वाल्या डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या रजिस्टर मध्ये कसल्याही प्रकरणी नोंदणी करण्यात येऊ नये अशी आग्रही मागणी केली. या संपामुळे शहरांमध्ये ऍलोपॅथी डॉक्टरांचे सर्व दवाखाने शंभर टक्के बंदमध्ये सहभागी झाल्याने दवाखान्यांमध्ये शुकशुकाट दिसत होता. याच वेळी मार्ड संघटनेने या मागणीला पाठिंबा देत बेमुदत संपाचे हत्यार उपसल्याने सरकारी दवाखान्या मधली आरोग्य यंत्र नाही संपूर्णपणे कोलमडून पडल्याचे दिसून आले महाराष्ट्र राज्यात सर्वत्र अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या रद्द कराव्या लागल्या ओपीडी साठी आलेल्या पेशंटलाही डॉक्टरांच्या कमतरतेमुळे वापस जावे लागले. आंदोलनाचा शहरातील खासगी रूग्णालयांमध्ये मोठा परिणाम दिसून आला. अनेक खासगी रुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभाग, अंतररूग्ण, शस्त्रक्रिया विभाग बंद राहिल्याने उपचारासाठी आलेल्या रुग्णांची गैरसोय झाली.**

शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातून आलेल्या रूग्णांना तपासणी, नियोजित शस्त्रक्रिया आणि फॉलोअपसाठी ताटकळत बसावे लागले.दरम्यान, राज्य शासनाकडून कोणताही तोडगा निघाला नसताना आणि बीएचएमएस, सीसीएमपी प्रकरण न्यायालय प्रविष्ट असताना ही मंगळवारी बीएचएमएस–सीएमपी पात्र डॉक्टरांची पहिली नोंदणी झाल्याने आयएमएने आंदोलन आणखी




आमच्यासाठी सर्व पॅथीचे डॉक्टर्स एकच हे मुख्यमंत्र्यांचे विधान दुर्दैवी – प्रदेश उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले

तीव्र करण्याचा निर्णय घेतला. गुरूवार पासून आपत्कालीन सेवांसह बेमुदत सेवा बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या आंदोलनात महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एसएमआय) तसेच विविध स्पेशालिस्ट संघटनांनी सहभाग जाहीर केला आहे. सरकारला पुरेसा वेळ देऊनही सरकारने मुद्दामून एमबीबीएस डॉक्टरांवर अन्याय होईल असा निर्णय घेतला आहे. या मिक्सोपॅथीमुळे सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे तसेच या निर्णयाविरूद्ध संवैधानिक पद्धतीने डॉक्टर संपावर गेलेले आहेत. या काळामध्ये जर एखाद्या रूग्णाची प्राण हानी झाली किंवा आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारवर राहील असा इशारा डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिला.

### निवासी डॉक्टरही आंदोलनात सहभागी होणार

आयएमएच्या आंदोलनाला आता महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एसएमआय) तसेच विविध स्पेशालिस्ट संघटनांनी पाठिंबा दिला आहे. शासनाने बीएचएमएस–सीएमपी नोंदणीचा निर्णय मागे न घेतल्याने गुरूवारपासून आपत्कालीन सेवांसह बेमुदत सेवा बंद आंदोलन करण्यात आले. निवासी डॉक्टरही आंदोलनात सहभागी झाल्याने शासकीय रूग्णालयांतील सेवा, आपत्कालीन विभाग आणि रूग्णसेवेवर व्यापक परिणाम झाला.

संपामुळे शासकीय रूग्णालयांतील सेवा विस्कळीत झाली. त्यामुळे बाह्यरूग्ण सेवा, नियोजित शस्त्रक्रिया, निवासी डॉक्टरांकडून दिली जाणारी सेवा तसेच आपत्कालीन व्यवस्थेवर ताण वाढण्याची भीती व्यक्त होत असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अशी मागणी डॉक्टर संघटनांकडून व सर्वसामान्य जनतेकडून करण्यात आली आहे.

### रूग्णांची गैरसोय ; खासगी रूग्णालयांत ओपीडी ठप्प

शहरातील अनेक खासगी रूग्णालयांमध्ये डॉक्टर संपावर गेल्याने बाह्यरूग्ण विभागात शुकशुकाट होता. नियोजित तपासण्या, फॉलोअप आणि किरकोळ शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्या. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून आलेल्या अनेक रुग्णांना उपचाराविना परत जावे लागले. काहींनी शासकीय रूग्णालयांकडे धाव घेतली मात्र तिथेही प्रचंड गर्दी आणि डॉक्टरांची संख्या कमी असल्याने निराशा झाली, तर काहींना पुढील तारखा देण्यात आल्या.

## घळाटवाडी प्रकरणी गुन्हे दाखल करून १५ वा वित्त आयोग व सर्व घरकुल योजनांतील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करा : विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या १५ व्या वित्त आयोगाच्या विकासकामांमध्ये, विविध घरकुल योजनांमध्ये तसेच ग्रामपंचायत स्तरावरील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा संपर्क प्रमुख विजयदादा साळवे यांनी केला आहे. यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देत संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये १५ व्या वित्त आयोगातील विकासकामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार, निधीचा अपव्यय, बनावट बिले, नियमबाह्य मंजुरी आणि कंत्राटी



प्रक्रियेत अनियमितता झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शासनाच्या निधीची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आदी घरकुल योजनांमध्ये पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्रांना लाभ देण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. अनेक गरीब व गरजू नागरिकांना घरकुल मिळाले नसताना काहींना नियमबाह्य पद्धतीने लाभ देण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, यामागे काही अधिकारी, कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक आणि राजकीय दलालांचे संगनमत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.याशिवाय घळाटवाडी ग्रामपंचायत निवडणुकीतील नामनिर्देशन प्रक्रियेत चुकीची माहिती सादर करण्यात आल्याचा आरोप करत या प्रकरणातील संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.रिपब्लिकन सेनेने या सर्व प्रकरणांची स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून सखोल तपास करावा, दोषींना निलंबित करून फौजदारी कारवाई करावी आणि पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.दरम्यान, या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून माजलगाव पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर रिपब्लिकन सेनेचे पंडित ओव्हाळ, सुरेश साळवे, वशिष्ठ लांडगे, वैजनाथ गडसिंग, सय्यद अन्वर, धम्मानंद गावडे, गंगाधर सोनपसारे, विशाल ससाने, भास्कर पौळ, मोकिंदा खरात, संतोष खुणे, विश्वनाथ तोडके, धम्मानंद पोटभरे, विलास खळगे, केशव चोपडे, राजरत्न भालेराव, राजू किर्ते, निवृत्ती गायकवाड, सचिन सोनकांबळे, सुरेश काळे, गौतम सोनपसारे, आनंद शिंदे, अजय साळवे, विशाल पायके आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पान ६ वरुन...

### माजलगावात अतिक्रमण

नगरपरिषद कर्मचारी, कर्मचारी पथक आणि जेसीबी यंत्रणा मोठ्या संख्येने तैनात करण्यात आली होती.संपूर्ण कारवाई शांततेत आणि कडेकोट

बंदोबस्तात सुरू असूनही सुरू असलेली कार्यवाही पाहण्यासाठी जनता रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी करताना दिसत आहे. दरम्यान,सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांनी बऱ्याच प्रमाणात मोकळा झालेला रस्ता पाहून समाधान व्यक्त केले.अनेकांनी या कारवाईचे स्वागत करत,वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अशी कारवाई आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. गेल्या काही दिवसांपासून अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनानंतर अखेर प्रशासनाने प्रत्यक्ष कारवाई सुरू केल्याने शहरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नाला निर्णायक सुरुवात झाल्याची भावना

नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. तूर्त काढलेले हे अतिक्रमण पुन्हा

बसणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे की पुन्हा अतिक्रमण जैसे थे होणार हे पाहणं औत्सुक्याचं राहणार आहे.

### रस्त्यावर गुंडगिरी करत दहशत

आणि लाकडी काठीने फिर्यादी व त्यांच्या भावावर जीवघेणा हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले व जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २२२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०९(१), ३०८(२), ११५(२), ११८(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी अण्णाभाऊ साठे चौक परिसरात सापळा रचून दोन्ही आरोपींना दि. ०२ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास शिताफीने ताब्यात घेतले व अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली हुंडाई कार, एक लोखंडी रॉड आणि लाकडी काठी जप्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी आदेश जोगदंड याच्यावर यापूर्वीही शिवाजीनगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, अस्त्रास्त्र कायदा व इतर गंभीर स्वरूपाचे ४ गुन्हे दाखल आहेत.

नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना व पोलिसांचे आवाहन

या सराईत गुन्हेगारांना तात्काळ अटक केल्याने नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. रस्त्यावर गुंडगिरी करून सर्वसामान्यांना वेठीस धरणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीची गय केली जाणार नाही. नागरिकांनी अशा गुंडांना न घाबरता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

पोलीस पथकाची उल्लेखनीय कामगिरी

सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब, सहायक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम साहेब, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि माधव काटकर, ग्रेड पोउपनि / राख, पोह/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/१९ अनिल आसेवार, पोशि/१९६७ अनिल घटमाळ व पोशि/२७२ नवनाथ डाके यांच्या पथकाने केली आहे.

### वारकरी सांप्रदायाचे नाव घेवून

केज येथे आयोजित शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी सरकारच्या स्मार्ट मीटर धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. वीज ग्राहकांच्या हिताचा विचार न करता केवळ आर्थिक भार सर्वसामान्यांच्या माथी मारण्याचा हा प्रकार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांनी आपापली मते व्यक्त करताना भाई मोहन गुंड यांनी शेकाप पक्षाची पायाभरणीसाठी केलेल्या योगदानबद्दल त्यांचे कौतूक करण्यात आले.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते दहा व्यक्तींना सन्मानित करण्यात आले त्यात कॉ.राजु देसले, संपादक गंमत भंडारी, ह भ प अविनाश भारती, भाई संपत पवार, प्रा.डॉ बाबासाहेब ठोंबरे, प्रा डॉ मुकुंद राजपंखे, शाहीर तुकाराम ठोंबरे, स्वरुपा सुंदर नाईकवाडे, अनिता कांबळे, कॉ.बळवंत कदम यांना क्रांतीसिंह नाना पाटील पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

### पेशंट येऊ नयेत म्हणून प्राथमिक

प्रश्नाकडे खासदारांनी स्वतः लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, जिल्हा आरोग्य प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन बंद असलेले प्रवेशद्वार सुरू करावे आणि नागरिकांना सुलभ व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी युसूफवडगांव येथील नागरिकांनी केली आहे.

## महापुरुषाच्या विचाराने उर्जा निर्माण होते -डॉ. बी.आर. मोटे

गेवराई । प्रतिनिधी

महापुरुष कोणत्याही जाती धर्माचे नसतात, त्यांच्या विचारातून सकल समाजाला प्रेरणा, उर्जा मिळत राहते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीतून प्रकट झालेल्या

विचाराची ज्योत नेहमीच पेटती राहीली पाहिजे. त्यासाठी , नवनवीन समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले पाहिजेत. असे प्रतिपादन आधार रुग्णालयाचे संचालक डॉ. बी.आर. मोटे यांनी येथे बोलताना केले.

गेवराई शहरातील साठे चौकात गुरूवारी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ते बोलत होते. व्यासपीठावरजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रोहित पंडित, माजी जिप सभापती युद्धाजीत पंडित, नपचे गटनेते राजेंद्र राक्षसभुवनकर, यशराज पंडित सभापती शहेदाद भाई, नगरसेवक ज्ञानेश्वर भाले, माजी नगरसेवक प्रभाकर तात्या पिसाळ,अशोक गायकवाड यांची उपस्थिती होती. ड. राक्षसभूवनकर, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांची भाषणे झाली. त्यांनी रक्तदान शिबीराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी अधिक सजग, दृढ होत असल्याचे सांगून उपक्रमाचे कौतुक केले. गेवराई शहरात




लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने गुरुवार ता. ३० रोजी सकाळी अकरा वाजता रक्तदान शिबीरात २५ तरूण रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग घेतला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रोहीत पंडित यांच्यासह युवा नेते, अमन सुतार, विशाल थोरात, डॉ. बी.आर. मोटे, महादेव पाटोळे, उज्वल सुतार, करण सुतार, साईनाथ हातागळे, बाळू धुरंधरे, पिंटू शेठ नेहरकर , साईनाथ हातागले ,माऊली धुमाळ अमजद पठाण यांनी रक्तदान केले. युवा नेते अमन सुतार, विशाल सुतार, उज्वल सुतार यांच्या संकल्पनेतून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी नगराध्यक्ष देवा धुरंधरे, उद्योजक रणजित सराटे, रणजीत खाजेकर, दिपक तात्या सुतार, राणा कानडे , प्रदीप कांबळे, राहुल सुतार, तीर्थराज धुरंधरे, शहदेव पाटोळे, मायकल सुतार, राजू अण्णा सुतार, माऊली सुतार, संतोषजी सुतार, अमोल सुतार, राजेंद्र सुतार ,अक्षय पवार , संतोषराव सुतार ,मिलिंद खाजेकर, दिपक सुतार , योगेश कांबळे यांनी प्रयत्न केले. जयंती उत्सव समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते रजनी सुतार यांचा समाजाच्या वतीने विशाल थोरात यांनी गौरव केले.

## सदाशिव भालेराव यांना अभिरा फाउंडेशनचा महाकवी वामनदादा कर्डक जीवन गौरव पुरस्कार जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील आदर्श शिक्षक तथा सदधम्म सेवा संघ माजलगावचे अध्यक्ष सदाशिव भालेराव गुरुजी यांना अभिरा फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात येणारा महाकवी वामनदादा कर्डक जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या १६ ऑगस्ट रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत परभणी येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.



सदाशिव भालेराव हे श्रावस्ती बुद्धविहार तथा , सदधम्म सेवा संघ माजलगाव चे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत . सदधम्म सेवा संघाच्या माध्यमातून माजलगाव येथे श्रावस्ती बुद्धविहाराची निर्मिती करून बीड जिल्ह्यातील एकमेव तिर्थक्षेत्राचे मान्यता घेतली आहे.धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असतो. तसेच माजलगाव येथे बौद्ध धम्म परिषद यशस्वीरित्या पार पाडून बौद्ध धम्माचा प्रसारक म्हणूनही काम करतात.

ते माजलगाव तालुक्यातील सोमठाणा या गावचे रहिवासी आहेत .तसेच गेले ३५ वर्षापेक्षा अधिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून विद्यादानाचे कार्य पार पाडत आहेत .कास्ट्राईब महासंघ चळवळीतील बीड जिल्हाचे नेतृत्व बऱ्याच वर्षांपासून करून शिक्षकाचे प्रश्नांची सोडवणूक करत आहेत . तसेच मतदार यादी पुनन्रिज्क्षण यामध्ये उत्कृ ष्ठ (बिएलओ) कामा बद्दल तालुका व जिल्हास्तरावरील , पुरस्कार मिळाला आहे त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व धम्म कार्याची दखल घेऊन अभिरा फाउंडेशन, परभणी महाराष्ट्र यांच्या वतीने दिला जाणारा महाकवी वामनदादा कर्डक जीवनगौरव पुरस्कार २०२६ साठी त्यांची निवड करण्यात आली आहे. येत्या १६ ऑगस्ट २०२६ रोजी परभणी येथे वामनदादा कर्डक त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून बी.रघुनाथ सभागृहात भव्य पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याचे संयोजक भदन्त मुदितानंद यांनी कळविले आहे. त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–११४३**
**दिनांक – ०६/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **जालिंदर अंबादास वजीर** रा. रेवलगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलीच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मोहिनी जालिंदर वजीर | मुलगी | ३०/०५/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–११४२**
**दिनांक – ०६/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **जालिंदर अंबादास वजीर** रा. रेवलगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलाच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | अभिषेक जालिंदर वजीर | मुलगा | ११/०७/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## अखेर आदिवासी पारधी वस्तीवर प्रशासनाच्या सहकार्याने पडला प्रकाश

बीड (प्रतिनिधी )तळेगाव येथील आदिवासी पारधी वस्तीवर महावितरण बीड, जिल्हाधिकारी कार्यालय व आदिवासी विभागाच्या वतीने तीन किलो मीटर दुरून खांब व डीपीचे महावितरण ने काम करून घेतले व आदिवासी पारधी समाजाचे बांधव बीड शहरातील रस्त्यावर राहून आपली उपजीविका भागवत होते त्यांना प्रशासनाच्या सहकार्याने घरे बांधण्यासाठी जागा घेऊन दिली पाण्याचा बोरवेल घेऊन दिला परंतु वीज जोडणीचे काम खर्चिक व दूरचे अंतर असल्यामुळे पुकार चे संवेदना फेलो व तत्वशील कांबळे यांनी विशेष प्रयत्न करून पारधी वस्तीवर मीटर जोडून प्रथमच आदिवासी पारधी समाजाच्या घरात प्रकाश पडला प्रेम सिंह राजपूत अधीक्षक अभियंता महावितरण बीड विशेष पुढाकार घेऊन एका दिवसांमध्येच तळेगाव येथील पारधी वस्तीवर मीटर बसवण्याचे आदेशित केले व त्यानुसार पिढ्यान पिढ्या जे अंधारात राहत होते त्यांच्या घरात आज प्रकाश पडला ते पडीक जागेत राहत असल्यामुळे विजेची व्यवस्था नसल्यामुळे हिंस्र प्राणी साप व इतर अडचणीचा त्यांना सतत सामना करावा लागत होता एका लहान बालकांना प्राण्याने हल्यात जखमी झाले होते त्यामुळे सतत भीतीच्या छायेखाली त्या ठिकाणी ते वावरत होते काल रात्री आठ वाजता स्वतः अधीक्षक अभियंता प्रेम सिंह राजपूत व त्यांची टीम महावितरण चे लेखाधिकारी प्रदीप वाघमोडे व तळेगाव येथील लाईन मॅन शेख रफिकभाई सामाजिक कार्यकर्ते संतोष निकाळजे तत्त्वशील कांबळे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांनी त्या ठिकाणी जाऊन मीटर बसवून घेतले मीटर बसवल्यानंतर स्वतः महावितरणाचे अधीक्षक अभियंता यांनी बल्ब बोर्ड इत्यादीचा खर्च करून त्या ठिकाणी बल्ब लावून प्रकाश पडला व सर्व आदिवासी समाज बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसत होता कारण आज पर्यंत यांनी कधीच स्वतःची लाईट लावलेली नव्हती दुसऱ्याच्या प्रकाशावर असते सतत अवलंबून असायचे आज जेव्हा स्वतःच्या घरामध्ये विद्युत प्रकाश पडला सर्व बांधवांचे चेहऱ्यावर आनंद फुलला.

आवाहन लवकरच त्या ठिकाणी शबरी आवास योजनेच्या माध्यमातून घरांचे बांधकाम होणार आहे या घरकुल योजनेमध्ये कोणी दानशूर व्यक्तींना घर बांधकामासाठी मदत करावयाचे असल्यास विविध साहित्याच्या माध्यमातून आपण मदत करू शकता विटा लोखंड वाळू दरवाजे फरशी व इतर साहित्याचा माध्यमातून बीड शहरातील बांधवांनी मदत करावी असे आवाहन तत्वशील कांबळे यांनी केले आहे बांधकाम साहित्याच्या मदत करण्यासाठी सपंर्क ९४२३४७०४३७.

# फळपीक विमा योजनेत बदल...!

## ५०० पेक्षा जास्त अर्ज असलेल्या तालुक्यांत पडताळणीसाठी होणार आता 'या' तंत्राचा वापर

मुंबई

पुनर्रचित हवामानाधारित फळपीक विमा योजनेतील बनावट अर्जांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाने यंदा उपग्रह तंत्रज्ञानाची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. एखाद्या तालुक्यातून ५०० पेक्षा अधिक विमा अर्ज प्राप्त झाल्यास त्या अर्जातील विमा संरक्षित क्षेत्राची पडताळणी थेट उपग्रहाद्वारे केली जाणार आहे.



शेतात संबंधित पीक नसल्याचे स्पष्ट झाल्यास अर्ज बाद करून शेतकऱ्याला पुढील पाच वर्षांसाठी योजनेतून बाद केले जाणार आहे. दरम्यान, मृग बहारातील या योजनेत यंदा विक्रमी ८५ हजार ३८३ विमा अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी जवळपास निम्मे म्हणजे ४२ हजार ४८५ अर्ज हळद पिकासाठी आले आहेत. पुणे जिल्ह्यातील अंजीर पिकासाठी केवळ २३२ अर्ज आले आहेत. शेतात फळपीक नसतानाही विमा उतरविणे, प्रत्यक्ष क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र दाखविणे, तसेच पडताळणी प्रक्रियेत चुकीची माहिती देण्याचे गैरप्रकार पूर्णपणे थांबत नसल्याने आता ५०० पेक्षा जास्त अर्ज असलेल्या तालुक्यांमध्ये उपग्रहाच्या माध्यमातून क्षेत्र पडताळणी करण्यात येणार आहे. उपग्रहाद्वारे केलेल्या पाहणीत अर्जात नमूद केलेल्या क्षेत्रात संबंधित पीक आढळले नाही, तर शेतकऱ्याला प्रथम नोटीस बजावण्यात येईल. त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर संबंधित शेताची प्रत्यक्ष पाहणी केली जाईल. उपग्रहाद्वारे मिळालेल्या माहितीत त्रुटी असल्याचे प्रत्यक्ष पडताळणीत स्पष्ट झाल्यास ती दुरुस्त करण्यात येईल. मात्र, शेतात पीक नसल्याचे सिद्ध झाल्यास विमा अर्ज तत्काळ बाद केला जाईल. अशा शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षांसाठी पीक विमा योजनेत सहभागी होता येणार नाही. त्यासोबतच संबंधित शेतकऱ्यांचा पीएम-किसान आणि नमो शेतकरी सन्मान निधी योजनेचा त्रैमासिक लाभही बंद केला जाणार आहे. दरम्यान, यंदाच्या पुनर्रचित फळपीक विमा योजनेत प्रथमच हळद आणि अंजीर या दोन पिकांचा समावेश केला आहे. योजनेसाठी ३१ जुलैअखेर एकूण ८५ हजार ३८३ विमा अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी जवळपास निम्मे म्हणजे ४२ हजार ४८५ अर्ज हळद पिकासाठी आहेत. यंदा संत्रा आणि मोसंबी पिकांच्या विमा अर्जात घट झाली आहे. गेल्या वर्षी मोसंबी पिकासाठी १६ हजार ८०८ अर्ज आले होते. यंदा ही संख्या निम्म्याहून अधिक घटून ७ हजार ८६२ झाली आहे. संत्रा पिकासाठी अर्जाची संख्या १० हजार ३६८ इतकी राहिली आहे.

# मिरची पिकातील पांढरी माशी नियंत्रण



सध्या सर्वच भागात मिरची पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत आहे. वातावरणातील सतत होणारे बदल, आर्द्रता, उष्णता याचा परिणाम म्हणून रसशोषक किडींचा वाढता प्रादुर्भाव दिसून येतो आहे. मिरची पिकांबरोबरच ईतरही पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे बदलत्या वातावरणाबरोबर दिवसेंदिवस कमी होत चाललेली जमिनिची सुपिकता आणि यामुळेच कमी होत असलेली पिकांची ही रोगप्रतिकारक क्षमता त्यामुळे सर्व प्रकारच्या रसशोषक किडींचा सर्व पिकांवर वाढता प्रादुर्भाव दिसून येत आहे.ओळख व लक्षणे : १. पांढरी माशी ही कीड टोमॅटो, मिरची, वांगी, कोबी व फळ पिकांवर आढळते. २. या किडींचा आकार ०.५ मिमी पेक्षा कमी असतो. रंग भुरकट पांढरा व डोळ्याचा रंग लाल असतो. ३. या किडींच्या पंखावर पांढरी भुकटी असते. कोश व किडींचा आकार फुगीर, गोलाकार असतो. ४. पिल्ले व प्रौढ शरीरावर केस असतात. ५. ही कीड पिल्ले व प्रौढ या दोन्ही अवस्थेत पानांतील रस शोषण करते. ६. त्यामुळे पानांचा रंग पिवळसर होतो. या किडीच्या जास्त उद्रेकामुळे फुलगळ होते व फल धारणा होत नाही आणि पांढऱ्या माशीचे नियंत्रणकरणे खूप जास्त आवश्यक बनते.

जीवनक्रम : १. ३० दिवसांचा (अंडी, पिले, कोष आणि प्रौढ) पांढरी माशी किडीची मादी पानांच्या खालच्या बाजूला १५० ते २०० पर्यंत अंडी घालते. २. १० दिवसात अंडी उबवून त्यातून पिल्ले बाहेर पडतात. ही पिल्ले योग्य वास्तव्य शोधण्यासाठी झाडावर भटकतात. ३. वास्तव निश्चित झाल्यावर वनस्पतीच्या पेशी जलात आपली सोंड खुपसून त्यातील रस शोषण करतात. ४. या किडीची पूर्ण वाढ ७० ते ७५ दिवसात होते. वाढ झालेली कीड कोषावस्थेत जाते. ५. ही अवस्था १६० दिवस असते. त्यातुन नंतर पांढरी माशी बाहेर पडते.

प्रादुर्भावाची लक्षणे : १. पानांच्या कडा खालील बाजूस वळतात. तसेच पाने पिवळी पडतात. २. पिले आणि प्रौढ पानातील रस शोषून घेतात. ३. तसेच पांढऱ्या माशीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या पारदर्शक चिकट द्रवावर काळ्या बुरशीची वाढ होते. ४. ही कीड पर्णगुच्छ (लीफ कर्ल) या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते. एकात्मिक किड नियंत्रण : १. जैविक नियंत्रण – बिव्हेरिया बॅसियाना + व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझिम ऍनिसोपली या जैविक उत्पादनाची ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी.

# आडसाली उसाच्या वाढीसाठी घ्या काळजी

सध्या आडसाली ऊस लागवडीचा कालावधी सुरू आहे. राज्यात मुख्यत्वे उसाची लागवड आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू हंगामात केली जात असली तरी आडसाली हंगाम फायदेशीर दिसून येतो. त्यामुळे शेतकरी सुद्धा आडसाली हंगामात ऊस लागवडीला प्राधान्य देतात. आडसाली उसाची उत्पादकता वाढविण्यासाठी जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन, सुधारित ऊस वाणांचा आणि दर्जेदार बियाण्याचा वापर, रोप लागवड तंत्र, ठिबक सिंचनद्वारे पाणी आणि खत व्यवस्थापन, तण नियंत्रण आणि आंतरमशागत या पंचसूत्री तंत्रज्ञानाचा वापर केल्यास अपेक्षित उत्पादन मिळू शकेल.



अधिक उत्पादन देणारे ऊस वाण : आडसाली ऊस लागवडीसाठी को. ८६०३२ (निरा), कोएम ०२६५ (फुले २६५), फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ आणि व्हीएसआय ८००५ या अधिक उत्पादन देणार्या वाणांची लागवड करावी. महाराष्ट्रामध्ये को ८६०३२ वाणाची ५० ते ५५ टक्के आणि फुले २६५ वाणाची ३० ते ३२ टक्के क्षेत्रावर लागवड केली जाते.

बेणे निवड : लागणीसाठी ऊस बेणे मळ्यातील ९ ते ११ महिने वयाचे अनुवांशिकदृष्ट्या शुध्द आणि निरोगी बियाणे वापरावे. उसाचे बियाणे लांब कांड्यांचे व फुगीर डोळ्याचे आणि रसरशीत असावे. दर तीन वर्षांनी बेणे बदलावे. अनुवंशिकदृष्ट्या शुध्द बेणे वापरल्यास ऊस उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते. २०२३ मध्ये पाडेगाव केंद्राने शिफारस केलेल्या फुले सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञानातून उसाची रोपे शेतामध्येच तयार करून लागवड करावी.

बेणे प्रक्रिया : उसावरील काणी रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी तसेच कांडीवरील खवले कीड व पिठ्या ढेकूण यांच्या नियंत्रणासाठी हेक्टरी १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम व ३०० मि.ली. डायमिथोएट १०० लिटर पाण्यात मिसळून बेणे १० मिनिटे बुडवावे. वरील प्रक्रियेनंतर ॲसिटोबॅक्टर १० किलो व स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत १.२५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात टिपरी ३० मिनिटे बुडवून नंतर लागवड करावी. जीवाणू खताच्या प्रक्रियेमुळे ५० टक्के नत्र व २५ टक्के स्फुरद खताची बचत होते.

लागवड तंत्र : आडसाली उसाची लागवड १५ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत करावी. रिजरच्या सहाय्याने भारी जमिनीत १५० सें.मी. व मध्यम भारी जमिनीत १२० ते १३५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. सरीची लांबी उतारानुसार २० ते ४० मीटर ठेवावी. एक डोळा पद्धतीने डोळा वरच्या बाजूस ठेवून १ फुट अंतरावर व दोन डोळ्यांची टिपरी वापरावयाची असल्यास दोन टिपऱ्यामधील अंतर अर्धा फूट ठेवून लागण करावी. जोडओळ पट्टा पद्धतीने लागवड करावयाची असल्यास मध्यम जमिनीसाठी २.५ फुटावर तर भारी जमिनीसाठी ३ फुटावर सलग सऱ्या पाडाव्यात. भारी जमिनीत कोरड्या पद्धतीने आणि हलक्या जमिनीत ओल्या पद्धतीने उसाची टिपरीने लागवड करावी, जेणेकरून टिपरी पद्धतीने लागवड केलेल्या उसाची उगवण चांगल्या पद्धतीने होण्यास मदत होईल. रोपांनी लागवड करताना सरी ओली करून त्यानंतरच लागवड करावी किंवा उसाची रोपे पाण्यामध्ये दाबून लागवड करावी. जेणेकरून रोपांची मर होत नाही.आडसाली उसातील आंतरपिके : आडसाली हंगामात आंतरपिके घेताना योग्य आंतरपिकाची निवड करणे गरजेचे आहे, अन्यथा आंतरपिकामुळे मुख्य ऊस पिकाकडे दुर्लक्ष होऊन उत्पादनात घट येते. आडसालीमध्ये खरीप हंगामातील भुईमुग, चवळी, सोयाबीन व भाजीपाला इत्यादी आंतरपिके घेता येतात. ऊस पिकामध्ये ताग, धैंचा यासारख्या हिरवळीच्या पिकांचा आंतरपिक म्हणून समावेश करता येतो व बाळबांधणीच्यावेळी हिरवळीची पिके सरीमध्ये गाडून बाळ बांधणी करता येते. यामुळे जमिनीची सुपीकता टिकविण्यास मदत होते.

# तूर पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन

तूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे कडधान्यवर्गीय पिक आहे. तुरीच्या डाळीचा समावेश आपल्या आहारामध्ये होतो. मागील काही वर्षांपासून तूर पिकाला चांगला बाजारभाव देखील मिळत आहे. काही भागामध्ये तूर फुलोरा अवस्थेमध्ये आहे. तूर पिकामध्ये विविध किडींचा प्रादुर्भाव होतो. किडींचा प्रादुर्भाव जास्त झाल्यास आर्थिक नुकसान होते. त्यामुळे पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी एकात्मिक कीड नियंत्रण महत्त्वाचे आहे.



तूर पिकावरील प्रमुख किडी : शेंगा पोखरणारी अळी/ घाटेअळी – ही अळी विविध पिकांवर दिसून येते. सध्या तूर पिकावर या किडीचे पतंग अंडी दिसू लागले आहेत. ही अळी नवीन कळ्या तसेच शेंगा खाते. कळी अवस्थेपासून ते शेंगा पक्वतेपर्यंत ही अळी तूर पिकावर दिसून येते. त्यामुळे या अळीमुळे पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. पिसारी पतंग – पाऊस संपल्यानंतर तूर पिकावर सर्वात आधी या किडीचा प्रादुर्भाव होतो. ही अळी तुरीच्या कळ्या, फुले यांना नुकसान करते, त्यानंतर शेंगानाही नुकसान करते. शेंगमाशी – ही कीड तूर पिकाला शेंगा लागण्याच्या सुरुवातीला निमुळते अंडे शेंगाच्या पापुद्र्याच्या आत घालते. त्यातून अळी बाहेर पडते. ही कीड तुरीच्या आतील शेंगा पोखरते. ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी – या किडीचा प्रादुर्भाव फुलोरावस्थेमध्ये होतो. या किडीच्या अंगावर ठिपके दिसतात. शेंगा ढेकूण – हा ढेकूण पानामधील तसेच शेंगामधील रस शोषण करतो.

पाने गुंडाळणारी अळी : ही पाने गुंडाळणारी अळी पानांचा गुच्छ तयार करते. त्यानंतर पाने खाते. या अळीच्या प्रादुर्भावामुळे अपेक्षेप्रमाणे फुलधारण होत नाही. पट्टेरी भुंगेरे – तूर पिकाला फुले लागल्यानंतर पट्टेरी भुंगेऱ्यांचा प्रादुर्भाव होतो. हे भुंगेरे फुले व फुलातील परागकण खातात. खोडमाशी – खोडमाशीच्या प्रादुर्भावामुळे तुरीचे वाढणारे खोड मलूल होतो. ज्या ठिकाणी पाणी साचले आहे, पिकाची वाढ कमी झाली आहे तसेच तूर व सोयाबीन आंतरपीक असल्यास या खोडमाशीचा प्रादुर्भाव जास्त होतो.तूर पिकावरील किडीचे एकात्मिक व्यवस्थापन : पाने गुंडाळणाऱ्या अळीची प्रादुर्भावग्रस्त पाने गोळा करून अळीसहित नष्ट करावीत. शेताच्या बांधावरील तुरीच्या शेंगा पोखरणाऱ्या अळीची पर्यायी खाद्यतणे उदा. कोळशी, रानभेंडी, पेटारी ही तणे वेळोवेळी काढून नष्ट करावीत. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या वेचून त्यांचा नाश करावा. पक्ष्यांना बसण्यासाठी हेक्टरी ५० ते ६० पक्षीथांबे शेतात लावावेत. शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठी पीक कळी अवस्थेत आल्यापासून हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे आणि पोत्यावर पडलेल्या अळ्या वेळोवेळी गोळा करून नष्ट कराव्यात. पीक कळी अवस्थेत असताना निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी. पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना मेटॅरीझीयम अनिसोप्ली हे बुरशीयुक्त कीडनाशक २ ते ३ मि.ली. व राणीपाल (०.०१ टक्के द्रावण) १ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेंगा पोखरणारी हिरवी अळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन.पी.व्ही. विषाणूची २५० एल. ई. प्रति हेक्टर प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी.रासायनिक पद्धतीने कीड नियंत्रण : किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या वर गेल्यावर रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. शेंगा पोखरणारी अळीसाठी: फ्ल्यूबेंडामाईड ३९.३५ एससी २ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा इमामेक्टिन बेन्झोएट ५ एसजी ४.४ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा स्पिनोसॅड ४५ एससी २ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. शेंगमाशीसाठी लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा ल्युफेन्युरोन ५.४० ईसी १२ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २८ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. पिसारी पतंग, शेंगमाशी व पाने गुंडाळणारी अळीसाठी इंडाक्झाकार्ब १५.८ ईसी ६.६६ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा नोवॅल्युरॉन ५.२५ + इंडोक्झाकार्ब ४.५० एसी हे कीटकनाशक १६.५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. शेंग ढेकूणसाठी डायमेथोएट ३० टक्के हे कीटकनाशक १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५३ : साली ब्रिटीश वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली.
१७८९ : अमेरिकेच्या सरकारी युद्ध विभागाची स्थापना झाली.
१९४२ : दुसरे महायुद्ध प्रशांत महासागरातील 'ग्वाडेल कॅनाल' येथे अमेरिकन सैन्य उतरले व दुसर्या महायुद्धातील एक भीषण लढाई खेळली गेली. या घटनेतुनच जपानच्या माघारीस सुरुवात झाली.
१९४७ : थोर हायरडल व त्याच्या सहकाऱ्यांनी बाल्सा लाकडापासुन तयार केलेल्या 'कॉन टिकी' या तराफ्यातुन १०१ दिवसात पॅसिफिक महासागरात ७,००० किमी प्रवास केला.
१९४७ : मुंबई महानगरपालिकेने 'बेस्ट' कंपनी आपल्या ताब्यात घेतली.
१९८१ : सलग १२८ वर्षे प्रकाशित झाल्यावर 'द वॉशिंग्टन स्टार' हे वृत्तपत्र बंद पडले.
१९८५ : जपानचे पहिले अंतराळवीर म्हणून ताकाओ दोई, मोमोरू मोहरी आणि चीकी मुकाई यांची निवड केली गेली.
१९८७ : अमेरिका ते सोव्हिएत संघ पोहून पार करणारे लिन कॉक्स हे पहिले व्यक्ती बनले.
१९९० : गल्फ युद्ध साठी पहिले अमेरिकन सैनिक सौदी अरेबियात पोहोचले.
१९९१ : जमिनीवरुन हवेत मारा करणार्या 'पृथ्वी' या क्षेपणास्त्राची श्रीहरिकोटा येथे तिसर्यांदा यशस्वी चाचणी
१९९७ : चित्रपट निर्माते गौतम घोष यांना इटालियन दिग्दर्शक सिका यांच्या नावाने दिला जाणारा 'व्हिट्टोरिओ डी सिका' हा सन्मान जाहीर
१९९८ : अतिरेक्यांनी दार-ए-सलाम, टांझानिया व नैरोबी, केनिया येथील अमेरिकन वकिलातींवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात २१२ लोक ठार झाले.
२००० : ब्रिटिश बुद्धिबळ स्पर्धेत नऊ वर्षाखालील गटात भारताच्या संकल्प मोदवलने संयुक्त विजेतेपद मिळवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३१ : चर्च ऑफ इंग्लंडचे एक मौल्यवान, शालेय शिक्षक आणि लेखक तसचं, केंब्रिज ॲपोस्टल्स सीक्रेट सोसायटीचे सदस्य फ्रेडरिक फरार यांचा जन्मदिन.
१८७१ : अवनींद्रनाथ टागोर जलरंगचित्रकार, रविंद्रनाथ टागोर यांचे काका, जलरंगातील त्यांचे वेगळे निर्मितीतंत्र हा आधुनिक भारतीय कलेच्या सुरुवातीच्या काळातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. (मृत्यू: ५ डिसेंबर १९५१)
१८७६ : माता हारी पहिल्या महायुद्धात गाजलेली डच नर्तिका, सौंदर्यवती व गुप्तहेर (मृत्यू: १५ आक्टोबर १९१७)
१९०४ : प्रसिद्ध भारतीय इतिहास, सांस्कृतिक कला व साहित्याचे विद्वान वासुदेव शरण अग्रवाल यांचा जन्मदिन.
१९१२ : केशवराव कृष्णराव दाते हृदयरोगतज्ज्ञ (मृत्यू: )
१९२५ : डॉ. मनकोम्बू साम्बसिवन तथा एम. एस. स्वामीनाथन भारतीय शेतीतज्ज्ञ, हरितक्रांतीचे जनक आणि केन्द्रीय कृषी मंत्री, हरित क्रांतीद्वारे भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण बनवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. जगभरातील सुमारे ४२ विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टरेट' ही पदवी दिली आहे. याखेरीज पद्मश्री, पद्मभूषण व पद्मविभूषण या सन्मानांखेरीज, रॅमन मॅगसेसे, वर्ल्ड फूड प्राइझ व इतर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलेले आहे.
१९३६ : दोन वेळा अश्डन पुरस्कार विजेते डॉ. आनंद कर्वे यांचा जन्म.
१९४८ : ग्रेग चॅपेल ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९६६ : विकिपीडियाचे सह-संस्थापक जिमी वेल्स यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : जेकब बर्झेलिअस स्वीडीश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २० ऑगस्ट १७७९)
१९३४ : जॅक्कार्ड लूम चे शोधक जोसेफ मॅरी जाकॉर्ड यांचे निधन. (जन्म: ७ जुलै १७५२)
१९४१ : रविंद्रनाथ टागोर कवी, लेखक, कलावंत, तत्त्वचिंतक आणि शिक्षणतज्ज्ञ, नोबेल पारितोषिक विजेते भारतीय लेखक. 'जन गण मन ' हे भारताचे राष्ट्रगीत त्यांनी लिहिले आहे. (जन्म: ७ मे १८६१)
१९७४ : अंजनीबाई मालपेकर भेंडीबाजार घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म:)
२००९ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील गीतकार आणि अभिनेते गुलशन बावरा यांचे निधन.
२०१८ : भारतीय लेखक आणि राजकारणी तसचं, तामिळनाडू राज्याचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन.

# मासेमारी जाळी आकाराच्या नियमनाचे महत्त्व

जगभरातील मत्स्यपालनाचा सामान्य इतिहास असे दर्शवितो की शोषणामध्ये हळूहळू वाढ झाली आहे, काही अंशी जमीन जवळ असलेल्या शोषणाच्या साठ्यात वाढ झाली आहे आणि काही अंशी मासेमारीच्या अधिक प्रयत्नांना दूरवरच्या मासेमारीच्या जागेपर्यंत वाढविल्यामुळे जाळी आकाराच्या नियमनाचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. माशांच्या जाळीच्या नियमनाचा सैद्धांतिक आधार ''इष्टतम कापणी रणनीती'' च्या संकल्पनेवर आधारित आहे, बर्याच व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या माशांच्या प्रजातींसाठी, भरती मोठ्या प्रमाणात साठा हे आकारात साठा आकाराशी संबंधित नाही. यामुळे परिपूर्णतेची पर्वा न करता, आयुष्यभर प्रत्येक वर्षाच्या शोषणासाठी इष्टतम () शोषणाच्या पद्धतीची कल्पना करणे शक्य करते.मासे पकडण्याची शक्यता असलेल्या संभाव्य वयाशी संबंधित विचार करता जसे की जेव्हा ते लहान असतात तेव्हा मासे पकडले जातात. जास्त प्रमाणात पकडल्याने लहान आकारातील मासे भविष्यातील माशांच्या उत्पादनाच्या शाश्वत विकासावर परिणाम करतात. याउलट, मासे फार म्हातारे होईपर्यंत पकडले गेले नाहीत तर त्या तुलनेने मोठ्या प्रमाणात मासे मिळतात. सैद्धांतिक दृष्टिकोन म्हणजे मासेमारीत दरवर्षाच्या वजनातील टिकाऊ उत्पन्न जास्तीत जास्त मिळविण्यासाठी कोणते सर्वोत्तम वय किंवा आकार घ्यावा हे ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. हे साध्य करण्याचे अनेक मार्ग आहेत आणि त्यापैकी एक म्हणजे प्रथम कॅप्चरचे वय (किंवा आकार) थेट नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, जाळीच्या नियमांचा एक उद्देश दीर्घकालीन टिकाऊ उत्पादनावर परिणाम करणे होय.



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

शुक्रवार दि.७ ऑगस्ट २०२६ | ५



# काँग्रेसची आढावा बैठक व रघुपती राघव राजाराम आंदोलन

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मा. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात जालना तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.बैठकीस जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, माजी आमदार राजेश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदरभाई चाऊस, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्यासह जालना तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राज्यातील व जिल्ह्यातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीच्या यादीतील त्रुटी, लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थी, नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण, शेतकऱ्यांना पीककर्ज वितरणातील अडचणी तसेच जालना जिल्ह्यातील विविध प्रलंबित लोकहिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या "रघुपती राघव राजाराम" आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.पदाधिकारी व कार्यकर्त्यांना जनतेच्या प्रश्नांबाबत अधिक सक्रिय राहण्याचे आवाहन केले. तसेच आगामी आंदोलन यशस्वी करण्यासाठी गावपातळीपर्यंत संघटन बळकट करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करण्याचे निर्देश दिले. बैठकीस कल्याण दळे, राजेश राठोड, बदरभाई चाऊस, कृष्णा पडूळ, ज्ञानेश्वर डुकरे, अशोकराव उबाळे, नारायण वाडेकर, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर इंगोले, सुरेश कदम, नारायण काका शिंदे,गणेश खरात,फकिराव मोहिते ,सर्जेराव पटेकर ,लाला पाटिल लकडे,विक्रम चव्हाण ,सुधाकर ढोकळे, बाळू वाहुळे, काकासाहेब गवारे देविदास चव्हाण तसेच जालना तालुक्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# शेतकऱ्यांसाठी कृषी योजनांना निधी उपलब्ध करून द्यावा

## राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे जिल्हाप्रमुख बोराडे यांची मागणी



मंठा। प्रतिनिधी

राज्याचे वित्त, नियोजन व कृषी राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल हे बदनापूर तालुक्याच्या दौऱ्यावर असताना शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर, संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उपस्थिती होती. या भेटीदरम्यान जिल्हाप्रमुख श्री. बोराडे यांनी परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध कृषी योजनांना तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

जिल्हाप्रमुख बोराडे म्हणाले की, " परतुर आणि मंठा तालुका हा शेतीप्रधान आहे. खरीप व रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना वेळेत बी-बियाणे, अनुदान, यांत्रिकीकरण आणि जलसंधारणाच्या योजनांचा लाभ मिळणे आवश्यक आहे. प्रलंबित असलेल्या योजनांना मंजुरी मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासंदर्भात चर्चा केली. राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल यांनी जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांच्या मागणीची सकारात्मक दखल घेतली. शेतकरी हिताच्या सर्व प्रस्तावांना प्राधान्याने मंजुरी दिली जाईल असे सांगितले.

# ॲट्रॉसिटीच्या केस मधुन तीन आरोपीची निर्दोष मुक्तता

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहमदनगर जिल्हा तदर्थ न्यायाधीश श्री पी.पी. देशपांडे यांनी भादवि आणि अनुसूचित जाती जमाती कायद्यान्वये दाखल असलेल्या खटल्यातून तीन आरोपीचीं गुणदोषावर मुक्तता केली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, गदेवाडी ता.शेवगाव जि अहमदनगर येथील महिला फिर्यादी समिंद्रा गुजर हिने शेवगाव पोलीस स्टेशन येथे काकासाहेब मारकंडे, गिताबाई मारकंडे आणि राजेंद्र नेव्हल सर्व रा. गदेवाडी ता.शेवगाव यांचे विरुद्ध भादवि आणि अनुसूचित जातीजमाती कायद्यानुसार जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून गुन्हा दाखल केला. सदर खटल्यात फिर्यादी हि चर्मकार समाजाची आहे तर आरोपी हे मराठा समाजातील आहेत अशी नोंद करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याचा तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र डिवायएसपी सुदर्शन मुंढे यांनी अहमदनगर जिल्हा न्यायालय येथे दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी तदर्थ जिल्हा न्यायाधीश पी.पी.देशपांडे यांचे समोर झाली. फिर्यादीस तिची केस न्यायालयात पुराव्यासह सिध्द करता आली नाही. म्हणून सबळ पुरावा नसल्याने पुराव्या अभावी न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपीचे वतीने फिर्यादीस फिर्याद दाखल करण्यास झालेला उशिर, जातीवाचक शिवीगाळ करताना पाहिलेला प्रत्यक्ष नसलेला साक्षीदार तसेच फिर्यादी व आरोपी यांचेतील पूर्वीचे वाद याबाबी न्यायालयात सिद्ध केल्या. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकल्यानंतर फिर्यादीने दाखल केलेल्या खटल्यात भक्कम पुरावा कोर्टात आला नाही हे सिद्ध झाले म्हणून न्यायालयाने काकासाहेब मारकंडे, गिताबाई मारकंडे आणि राजेंद्र नेव्हल यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीचे वतीने ॲड शिवाजी अण्णा कराळे, ॲड करुणा शिंदे, ॲड सत्यजीत कराळे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड मोनाली कराळे, ॲड दिप्ती शिंदे, ॲड समिक्षा उनवणे आणि ॲड विजय शिंदे यांनी सहकार्य केले.

# गजानन महाराज पालखी ७ ऑगस्टला जालना जिल्ह्यात

जालना। प्रतिनिधी

श्री गजानन महाराज संस्थान शेगाव या न्यासाची श्री ची पालखी पायदळवारी पालखी परंपरेनुसार पंढरपुर येथुन परतीच्या मार्गावर असुन या दिंडीमध्ये ७०० ते ८०० वारकरी सहभागी आहेत. ही पायी दिंडी ही दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी जालना जिल्ह्यात प्रवेश करणार असुन दि. ९ ऑगस्ट २०२६ ते दि. १० ऑगस्ट २०२६ पर्यंत जालना शहरात मुक्कामी राहून दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी जालना नाव्हा मार्गे सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणाकडे प्रयाण करणार आहे. ही पायी दिंडी बुलढाणा जिल्ह्यात प्रवेश करतेवेळी जालना नाव्हा-सिंदखेड राजा महामार्ग क्रमांक ७५३ सी वर मार्गक्रमण करणार आहे.



दिंडीचे दर्शन घेण्याकरीता मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होणार असुन जड वाहनांच्या रहदारीमुळे क्षुल्लक बाबी वरुन विवादीत परिस्थिती निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पायी दिंडीतील भाविकांच्या व जनतेच्या सुरक्षिततेसाठी व वाहतुकीच्या सुनियमनासाठी या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. यामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ सी वरील जालना नाव्हा-सिंदखेड राजा रोडवरील येणारी व जाणारी वाहतुक व्यवस्था दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ४.०० ते रात्री ८ वाजेपर्यंत खालील सर्व प्रकारच्या जड वाहतुकीस खाली दिलेल्या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. अंबड चौफुली, मंठा चौफुली, कन्हैयानगर बायपास जालना- नाव्हा-सिंदखेड राजा मार्गे सुलतानपुर-मेहकरकडे जाणारी व येणारी जड वाहतुक पर्यायी मार्ग कन्हैयानगर जालना मार्गे देऊळगाव राजा- चिखलीकडे जातील व येतील.वरील मार्गाच्या जड वाहतुकीसाठी दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ४.०० ते रात्री ८ वाजेपर्यंत बदल करण्यात आला आहे.

### जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती एम. एस पठारे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

**किरकोळ दिवाणी अर्ज ११४७/२०२६**

**ॲड. जी.एस.घुगे**

**रतनबाई भ्र. बाबुचंद खंदारे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. रतनबाई भ्र. बाबुचंद खंदारे, वय-२७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मु.पो. कारेगव्हाण, ता. जि. बीड, २. स्नेहल पि. बाबुचंद खंदारे, वय-११ वर्षे, धंदा-शिक्षण, अ.पा.क अर्जदार क्र.१ आई रा. मु.पो. कारेगव्हाण, ता. जि. बीड, ३. ऋषीकेश पि. बाबुचंद खंदारे, वय-९ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क अर्जदार क्र.१ आई रा. मु.पो. कारेगव्हाण, ता. जि. बीड, ४. सुदामती भ्र. चंद्रसेन खंदारे, वय-६२ वर्षे, धंदा-निरंक, रा. मु.पो. कारेगव्हाण, ता. जि. बीड

गैरअर्जदार :- निरंक

(अर्जदार हे भारतीय आहेत)

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी 'या' न्यायालयात बाबुचंद चंद्रसेन खंदारे याचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी बाबुचंद चंद्रसेन खंदारे यांचा दिनांक ०५.१०.२०२५ रोजी सांयकाळी ७.०० वाजणेच्या दरम्यान येळंब फाट्याजवळ मोटार सायकल क एम एच २३ बी पी ०५७१ गाडी खडयात अदळल्याने मागचे मागेच उडून रोडवर खाली पडल्याने डोक्याला व इतर ठिकाणी मार लागुन उपचारादरम्यान मृत्यु झालेला असुन अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र. ३ ही मयताची मुलगी असुन अर्जदार क्र.४ ही मयताची आई आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत बाबुचंद चंद्रसेन खंदारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक ३० जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ८ सप्टेंबर २०२६

स्वाक्षरीत/-
**क. लिपीक**

आदेशावरुन,
स्वाक्षरीत/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

### कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि.जालना

**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com

०२४८३-२७१७८७

जा.क्रं.२०२६/नपघ/ जा.प्र./कावी- ६९१

दिनांक: ०६/०८/२०२६

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अशोक भगवान तिकांडे रा. रामगव्हाण खुर्द ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे कृष्णा विठ्ठल काळे रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. १९७२ दि. १९/०५/२०१८ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. ८७३ दिनांक:-०५/०८/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. कृष्णा विठ्ठल काळे रा.ता.घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १६६४/१६ मधील क्षेत्र ८९.२१ चौ. मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

**पुर्वेस :- कृष्णा विठ्ठल काळे यांची जागा**
**पश्चिमेस :- मिळकत नं. १६६४/१५**
**दक्षिणेस :- २० फुटाचा रस्ता**
**उत्तरेस :- ज्ञानेश्वर सोमवारे यांची जागा**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ८९.२१ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरीत/-
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२७**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८६७**
**दिनांक - २२/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती कैलास प्रेमसिंग राठोड रा. झिर्पी तांडा कैलास नगर ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगाच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | कार्तिक कैलास राठोड | मुलगा | १८/०७/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# खरवंडी कासार मुख्य रस्त्याच्या वाहतुकीचा पूल बनला अतिक्रमित आणि धोकादायक !



पाथर्डी प्रतिनिधी

खरवंडी कासार लोकनेते गोपीनाथ मुंडे चौकातील मुख्य रस्त्याचा पूल शेवटच्या घटका मोजत असून राष्ट्रीय महामार्ग २२२ चा पूर्वीचा पूल अत्यंत धोकेदायक बनला असून रस्त्याने चालणेही मुश्किल झाले आहे लोकसभा निवडणुकीपूर्वी या पूलाच्या कामासाठी माजी खासदार सुजय विखे यांनी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता परंतु लोकसभा निवडणुकीत पराभूत होताच सदरील पुलाच्या मंजूर कामाचा निधी जिल्हा नियोजन समिती विकास निधीत वर्ग करण्यात आला विद्यमान खासदार निलेश लंके हे नगर दक्षिणेचे खासदार म्हणून निवडून आले परंतु निवडून आल्यानंतर आजपर्यंत निलेश लंके यांनी पाथर्डी तालुक्यातील भगवानगड पंचक्रोशी परिसरात ढुंकूनही पाहिले नाही विकासाच्या कामाचा अनुशेष तर फार दूरची गोष्ट आहे अशी टीका भाजपचे वामनराव किर्तने यांनी केली आहे सदरील पुलाच्या कामासाठी आमदार मोनिका राजळे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून पाठपुरावा करून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपर्यंत खरवंडी कासार राष्ट्रीय महामार्ग २२२ जुना गोपीनाथ मुंडे चौक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते बायपास असा संपूर्ण रस्ता मंजूर करावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गोपीनाथ मुंडे चौक येथपासून ते अण्णाभाऊ चौक ते बायपास या रस्त्यावर अतिक्रमण केल्याने मुख्य बाजारपेठेतील रस्ता अरुंद झाला आहे रविवारचा आठवडे बाजार भरणे किंवा मुख्य बाजारातील रस्त्यावर गटारी आणि घाणीचे साम्राज्य पसरल्याने मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी आणि व्यापारी वर्गांना मनस्ताप सहन करावा लागत आहे यासाठी ग्रामपंचायत प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासन यांच्याकडून अतिक्रमण काढून मुख्य रस्ता मोकळा करण्याची मागणी खरवंडी कासार येथील व्यापारी वर्ग करत आहे.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२७**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११४१**
**दिनांक - ०६/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राजू फुलचंद परमेश्वर रा.लकमापुरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सलोनी राजु परमेश्वर | मुलगी | ३१/०७/२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२७**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-३२८**
**दिनांक - ०५/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रामेश्वर किसनराव बिबे रा.वडीगोदरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | रामेश्वर किसनराव बिबे | स्वतः | ०१/०७/१९८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२७**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८६८**
**दिनांक - २२/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती कैलास प्रेमसिंग राठोड रा. झिर्पी तांडा कैलास नगर ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | आरोही कैलास राठोड | मुलगी | ०३/१०/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

दैनिक
# राज्य लोकतंत्र

शुक्रवार दि.०७ ऑगस्ट २०२६ | ६

# क्रीडाज्योतीच्या तेजात उजळला कडा; हजारो विद्यार्थ्यांचा उत्साहात प्रतिसाद

## माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय क्रीडा महोत्सव, डीपीएल पारितोषिक वितरण व रक्तदान शिबिराचा प्रेरणादायी संगम

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्रांगण गुरुवारी क्रीडाप्रेम, उत्साह आणि सामाजिक बांधिलकीच्या तेजाने उजळून निघाले. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ व आनंद चॅरिटेबल शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय क्रीडा महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या धोंडे प्रीमियर लीग (डीपीएल) क्रिकेट स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. उद्घाटनापूर्वी कडा शहरातून क्रीडाज्योतीची भव्य रॅली काढण्यात आली असून आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण परिसर क्रीडामय वातावरणाने



भारावून गेला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले, खेळात सर्वोच्च यश मिळवायचे असेल तर जागतिक स्तरावर विक्रम प्रस्थापित करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सातत्य, शिस्त आणि कठोर परिश्रमाची कास धरावी; त्यातूनच यशाची सर्वोच्च शिखरे गाठता येतात. वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन अजय धोंडे, अभय धोंडे, ज्येष्ठ संपादक नरेंद्र कांकरिया, सुभाष चौरे, सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक घनश्याम पाळवदे, हनुमंत काळे, प्रशासनाधिकारी डी बी राऊत, अशोक साळवे, पत्रकार राजेश राऊत, राजेंद्र जैन, दिगंबर बोडखे, दीपक बोराडे, यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी केले, तर सूत्रसंचालन उपप्राचार्य बापू खैरे यांनी केले.

### क्रीडेतून घडते व्यक्तिमत्त्व, रक्तदानातून जपली जाते माणुसकी

**क्रीडा ही केवळ विजयाची शर्यत नसून शिस्त, जिद्द आणि संस्कारांची जीवनशाळा आहे. मैदानावर घाम गाळणारे हातच उद्याचे यशस्वी भविष्य घडवतात, तर रक्तदान करणारे हात समाजाला नवजीवन देतात. कडा येथे क्रीडाज्योत, खेळाडूंचा गौरव आणि रक्तदानाचा प्रेरणादायी संगम घडवत माजी धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा झालेला हा उपक्रम युवकांसाठी प्रेरणेचा दीप ठरला.**

# रस्त्यावर गुंडगिरी करत दहशत माजवणारे व लूटमार करणारे दोन सराईत गुंड काही तासांतच जेरबंद

## शिवाजीनगर पोलिसांची धडक कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

रस्त्यावर गुंडगिरी करणाऱ्या, दहशत माजविणाऱ्या व सर्वसामान्यांना नाहक त्रास देणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याच्या पोलीस अधीक्षक श्री. नवनीत साहेब यांनी स्पष्ट व सक्त सूचना दिल्या आहेत. या सूचनेची तत्परतेने अंमलबजावणी करत, शिवाजीनगर पोलिसांनी हातात शस्त्रे घेऊन दहशत माजवणारे व धाक दाखवून लूटमार करणाऱ्या दोन सराईत आरोपींना गुन्हा घडल्यानंतर अवघ्या काही तासांतच बेड्या ठोकल्या आहेत.

दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ०९.०० ते ०९.३० वाजेच्या सुमारास बंब सर्कल, नगर नाका येथील बालाजी नाष्टा सेंटर येथे फिर्यादी दिलीप साहेबराव वायभट (वय ३८) हे काम करत असताना, आरोपी १) स्वप्नील भाऊसाहेब शिंदे (वय ३४, रा. श्रीरामनगर) आणि २) आदेश भगवान जोगदंड (वय २४, रा. जायकवाडी कॉलनी) हे त्यांच्या कारमधून (MH-23--U-6988) तिथे आले. त्यांनी नाश्त्याचे पैसे न देता उलट फिर्यादीकडे दारू पिण्यासाठी पाच हजार रुपयांची बेकायदेशीर मागणी करत शिवीगाळ सुरू केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यावर, आरोपींनी बिअरच्या बाटलीने, लोखंडी रॉडने ◀◀ पान ३ वर



# माजलगावात अतिक्रमण हटाव मोहिमेला वेग; अनेकांनी रात्रीच स्वत: अतिक्रमणे काढली

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते करवा पेट्रोल पंप मार्गावरील अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेला दि ०६ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळपासून वेग आला.प्रशासनाने दिलेल्या अंतिम मुदतीनंतर अनेक नागरिक आणि व्यावसायिकांनी दि ०५ ऑगस्ट बुधवार रोजी रात्रीच स्वखुशीने आपली अतिक्रमणे हटविली. त्यामुळे अनेक वर्षांनंतर मुख्य रस्ता मोकळा होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

प्रशासनाने अतिक्रमण धारकांना स्वतः अतिक्रमण काढण्यासाठी दि ०६ ऑगस्ट गुरुवार रोजी अंतिम मुदत दिली होती.मुदत संपताच पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने कारवाईला सुरुवात करण्यात आली.रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सुमारे ५०-५० फूट क्षेत्रातील अतिक्रमणे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले.छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरातील रोडवरील टपऱ्या, हातगाड्या,शेड, रस्त्यावर ठेवलेले साहित्य आणि इतर अतिक्रमणे हटविण्यास सुरवात करण्यात आली.या कारवाईदरम्यान पोलीस प्रशासन, एमएसआरडीसचे अधिकारी व कर्मचारी, ◀◀ पान ३ वर



अल्टिमेटम संपताच प्रशासनाची बंदोबस्तात जेसीबीची कारवाई; रस्ता मोकळा होण्यास सुरवात

# लोकप्रतिनिधी या नात्याने कोणावरही अन्याय होणार नाही, हीच आमची प्राथमिक जबाबदारी - आ.सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेस दि ०६ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी प्रारंभ झाला.या पार्श्वभूमीवर शहरातील फळ विक्रेते व भाजी विक्रेत्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी ए.आय.एम.आय. एम चे इद्रिस पाशा व शेख युसुफ यांनी सुरू केलेल्या उपोषणाची दखल घेत त्यांच्या प्रतिनिधींशी आ.प्रकाश सोळंके यांनी सकारात्मक चर्चा केली चर्चेदरम्यान फळ व भाजी विक्रेत्यांसाठी भाडे तत्त्वावर पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबत लेखी आश्वासन देण्यात आले.संबंधित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन





मिळाल्यानंतर ए आय एम आय एम चे तालुकाध्यक्ष इद्रीस पाशा व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपोषण मागे घेण्यात आले.

लोकप्रतिनिधी म्हणून विकासकामांसोबतच सर्वसामान्य नागरिक,लहान व्यावसायिक व कष्टकरी घटकांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करणे आणि कोणावरही अन्याय होऊ न देणे,ही आमची कायमची भूमिका असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितले

# एलआयसीच्या जयपूर स्पर्धेत रुक्मिणी आंधळे यांची निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

भारतीय जीवन विमा निगम शाखा माजलगावच्या वतीने जुलै महिन्यात सर्वाधिक विमा पॉलिसी करणाऱ्या विमा प्रतिनिधींसाठी आयोजित करण्यात आलेल्या जयपूर स्पर्धेत वडवणी तालुक्यातील पिंपळा, रुई गावच्या सरपंच सौ. रुक्मिणी केशव आंधळे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादित केले आहे. जुलै महिन्यात त्यांनी एलआयसी विमा पॉलिसी पूर्ण करुन या विशेष स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. भारतीय जीवन विमा निगम, माजलगांव शाखेचे विकास अधिकारी नंदकुमार मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ग्राहकांमध्ये जीवन विम्याबाबत जनजागृती निर्माण करणे, कुटुंबांना आर्थिक सुरक्षिततेचे कवच उपलब्ध करुन देणे आणि विमा प्रतिनिधींना उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन देणे, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सौ. रुक्मिणी आंधळे यांनी आपल्या कार्यक्षमतेची आणि सातत्यपूर्ण मेहनतीची छाप पाडत जुलै महिन्यात एलआयसी पॉलिसी पूर्ण केल्या. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांची जयपूर स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



# गेवराई नगराध्यक्षांविरोधातील अपात्रता अर्ज फेटाळला; जिल्हाधिकाऱ्यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष श्रीमती गीता त्र्यंबक उर्फ बाळारजे पवार यांच्याविरोधात अर्जदार संजय काळे यांनी दाखल केलेला अपात्रतेचा अर्ज बीड जिल्हाधिकाऱ्यांनी फेटाळून लावत महत्त्वपूर्ण आदेश पारित केला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदी, उपलब्ध कागदपत्रे, लेखी म्हणणे, न्यायालयीन नोंदी तसेच संबंधित कायद्याचा सखोल विचार करून हा निर्णय देण्यात आला.

सुनावणीदरम्यान नगराध्यक्षांच्या वतीने ड. राधेशाम बी. जाजू यांनी प्रभावी व मुद्देसूद युक्तिवाद करत अर्जातील आरोप वस्तुस्थिती, कायदा व उपलब्ध पुराव्यांच्या कसोटीवर टिकत नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेत संबंधित कायद्याच्या तरतुदींचे सविस्तर विश्लेषण केले. तसेच अर्जदार संजय काळे यांनी केलेले सर्व आरोप पुराव्याअभावी सिद्ध करण्यात अपयशी ठरले असून, जिल्हाधिकारी न्यायालयासमोर त्यास कोणताही ठोस कायदेशीर अथवा वस्तुनिष्ठ आधार दाखविता आला नाही, असे ठामपणे मांडले. अर्जदाराने नगराध्यक्षांविरोधात विविध आरोप करत अपात्रतेची मागणी केली होती. मात्र सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा, दोन्ही बाजूंच्या युक्तिवादाचा तसेच संबंधित कायदेशीर तरतुदींचा सखोल विचार करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या सविस्तर आदेशात उपलब्ध नोंदी, लेखी म्हणणे, कायदेशीर तरतुदी तसेच न्यायालयीन निर्णयांचा आधार घेत अर्जदाराचे म्हणणे ग्राह्य धरता येत नसल्याचे नमूद केले. सदर प्रकरणात करण्यात आलेले आरोप सक्षम पुराव्यांच्या आधारे सिद्ध करण्यात अर्जदार अपयशी ठरल्याचे तसेच नगराध्यक्षांविरुद्ध अपात्रतेची कार्यवाही करण्यासाठी आवश्यक असा कायदेशीर आधार उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करत अपात्रतेचा अर्ज नामंजूर करण्यात आला.

# विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ यांच्याविरोधात प्रधान मुख्य वनसंरक्षकांकडे तक्रार –अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

बीड वन विभागामध्ये विविध विकासकामांच्या नावाखाली एकाच परिसरातील व एकाच स्वरूपाच्या कामांचे कृत्रिम तुकडे करून शासनाच्या वित्तीय नियमांचे, निविदा प्रक्रियेचे तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयांचे उल्लंघन झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ यांच्यासह संबंधित काही परिक्षेत्र वन अधिकारी (ठऋज), तांत्रिक अधिकारी व इतर जबाबदार अधिकाऱ्यांवर संगनमताने भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल करण्यात आली आहे.


तक्रारीमध्ये जिल्हा नियोजन समिती, बीडमार्फत २०२२ ते २०२५ या कालावधीत मंजूर झालेल्या विविध प्रशासकीय मान्यतांचा अभ्यास करून तब्बल १८ प्रमुख मुद्द्यांमध्ये गंभीर अनियमितता निदर्शनास आणण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी एकाच गावातील, एकाच परिसरातील आणि एकाच स्वरूपाची कामे लहान-लहान भागांमध्ये विभागून स्वतंत्र प्रशासकीय मान्यता घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार अनेक प्रस्तावांवर विभागीय वन अधिकाऱ्यांच्या पत्रांचा जावक क्रमांकच नमूद करण्यात आलेला नाही. काही प्रकरणांमध्ये एकाच प्रस्तावावर दोन स्वतंत्र प्रशासकीय मान्यता आदेश काढण्यात आले असून, अनेक कामे जाणीवपूर्वक विभागून स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया टाळण्यात आल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच वनरोपण, मृद व जलसंधारण, गुरे प्रतिबंधक चर, वनसंरक्षण, वन्यजीव व्यवस्थापन, इको-टुरिझम, घनदाट वृक्षलागवड, साहित्य खरेदी आदी योजनांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या कामांचे कृत्रिम विभाजन करून विशिष्ट कंत्राटदारांना अनुचित लाभ मिळवून देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारदाराने या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित विभागीय वन अधिकारी, काही परिक्षेत्र वन अधिकारी (ठऋज), तांत्रिक अधिकारी, प्रशासकीय मान्यता देणारे अधिकारी तसेच संबंधित कंत्राटदार यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रकरणात भ्रष्टाचार अथवा आर्थिक गैरव्यवहार आढळल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (-उइ), आर्थिक गुन्हे शाखा (एजथ) किंवा अन्य सक्षम चौकशी यंत्रणेमार्फत तपास करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामांची अंतिम बिले, देयके व पुढील प्रशासकीय कार्यवाही स्थगित करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. या गंभीर आरोपांमुळे बीड वन विभागातील विकासकामांच्या अंमलबजावणीबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता शासन या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करते का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पेशंट येऊ नयेत म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राचे गेट कायम बंद ?

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे एक प्रवेशद्वार अनेक दिवसांपासून कायम बंद ठेवण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना अडथळा निर्माण होईल, अशा पद्धतीने गेट बंद ठेवले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शेतशिवारात राहणारे अनेक ग्रामस्थ प्रथमोपचार, गोळ्या-औषधे आणि नियमित उपचारांसाठी या आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. मात्र, प्रवेशद्वार बंद असल्यामुळे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि



खासदारांच्या युसूफवडगांव जि.प. गटातील आरोग्य व्यवस्थेचा अजब कारभार; नागरिकांमध्ये संताप

दिव्यांग व्यक्तींना मोठा वळसा घालून दुसऱ्या गेटमधून जावे लागते. त्यामुळे विशेषतः आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या संदर्भात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे आरोग्य केंद्रातील कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, जर वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच रुग्ण येऊ नयेत असे वाटत असेल, तर शासनाने या प्राथमिक आरोग्य केंद्राची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी. आरोग्य सेवा ही नागरिकांच्या सोयीसाठी असते; रुग्णांना अडवण्यासाठी नाही, असे म्हटले आहे. विशेष म्हणजे, युसूफवडगांव येथील हे प्राथमिक आरोग्य केंद्र बीडचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या जिल्हा परिषद गटात येते. तसेच त्यांच्या गावातील आरोग्य उपकेंद्रही याच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने या ◀◀ पान ३ वर

# वारकरी सांप्रदायाचे नाव घेवून मारामाऱ्या करा म्हणणारा वारकरी नव्हेच -माजी आ. बाळाराम पाटील

**केज । प्रतिनिधी**

क्रांतीसिंह नाना पाटील व कॉ अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव व भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन यानिमित्त केज येथील मुक्ताई सभागृहात भव्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील पुरस्कार मूर्तींना सन्मानचिन्ह सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

बोलताना पाटील म्हणाले संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अनेक जाती धर्मांच्या लोकांनी एकत्र येवून उभा केली . जाती धर्मात द्वेश पेटविण्याचा महाराष्ट्रात धंदा सध्या महाराष्ट्रात सध्या सुरू असून वारकरी संप्रादायाचे नाव घेवून याला मारा त्याला झोडा म्हणारा वारकरी असूच शकत नसल्याचे मत माजी मंत्री बाळाराम पाटील यांनी केज येथे आयोजित क्रांतिसिह नाना पाटील जयंती व अण्णाभाऊ साठे जयंती व शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापनदिनी पुरस्कार सोहळ्यादरम्यान केले. यावेळी स्मार्ट मिटरच्या नावाखाली हे सरकार सर्वसामान्यांची फसवणूक करत असल्याचे मत शेकाप महिला प्रदेशाध्यक्षा तथा नगराध्यक्षा ड. मानसी म्हात्रे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपद म्हणुन मा.आ. बाळाराम पाटील, ध्वजारोहण ड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले, उद्घाटकन भाई रामदास जराते यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार ज्ञानोबा गायकवाड,



क्रांतिसिह नाना पाटील, कॉ.अण्णाभाऊ साठे जयंती, शेकापचा वर्धापन दिनी पुरस्कार वितरण सोहळा थाटात संपन्न

## स्मार्ट मिटरच्या नावाखाली सरकारकडून सामान्यांची लूट -ॲड.मानसी म्हात्रे

राजेसाहेब देशमुख, भाई पोपटराव बोराडे, ड नारायण गोले पाटील भाई बापूसाहेब सोळुंके, कॉ भाऊराव प्रभाळे, कॉ पंकज चव्हाण भाई बाळासाहेब धस ड अनिकेत देशमुख भाई राजू सुरनर , हनुमंत भोसले, शिवाजी ठोंबरे दलील इनामदार, अमोल घोगरे, बाबुराव गालफाडे सय्यद शरीफ, शितल लांडग, कपिल मस्के, बाळासाहेब मोरे, रोहित कसबे, बापु वैरागे गोपीनाथ भोसले उपस्थित होते, कार्यक्रमात बोलताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या संघर्षमय वाटचालीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. या देशाची लोकशाही विविध चळवळींतून शेतकरी कामगार पक्षाने पुढे नेली आहे. शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी शेकापने सातत्याने संघर्षाची भूमिका घेतली,असे त्यांनी सांगितले. क्रांतिसिंह नाना पाटील आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज व्यक्त करताना पाटील यांनी सामाजिक समता, बंधुता आणि सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे आवाहन केले.

**शेतकऱ्यांना/बेरोजगारांनो जोडधंद्यामधून लखोपती व्हा**

**विविध महामंडळाचे/जिल्हा उद्योग केंद्र/पशुसंवर्धन/अण्णासाहेब पाटील इत्यादी शासनाचे शेळीपालन/पशुपालन/दुग्ध व्यवसाय/कोंबडी पालन/वराह पालन इत्यादी जोड धंद्यामधून मार्गदर्शन घ्या.**

**प्रशिक्षण प्रमाणपत्रासाठी फोटो आधारकार्ड, ७५०/-आवश्यक**
**शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२६ वेळ सकाळी १० ते १ राहील.**
**ठिकाण : हॉटेल अतिथी, शिवाजी पुतळ्याजवळ, बीड**





संपर्क
डॉ.वसंत र.मुंडे
बी.व्ही.एससी.अँड ए.एच.
मो.नं.९४२२५६५३६५

प्रमाणपत्रासाठी ७५० रु.फीस राहील.
आधारकार्ड, २ फोटो आवश्यक
दि.८ ऑगस्ट २०२६
वेळ सकाळी १० ते १

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26